चतुरस्त्र प्रतिभेचे समाजसेवी कायदे पंडित
चारित्र्य व कर्तृत्व यांचा सुरेख संगम.

गुरुवर्य ग. मा. दिवेकर

गुरुवर्य ग. मा. दिवेकर

*

: संपादक :

गुं. फ. आजगांवकर

गुरुवर्य ग. मा. दिवेकर

*

: संपादक :

गुं. फ. आजगांवकर

श्री. ग. मा. दिवेकर

संपादक व प्रकाशक :

– गुं. फ. आजगांवकर

प्रबोधनरिसर्च असोसिएट्स्

१७, के. जी. बी. निवास,

गिरगांव, मुंबई–४.

※

मुद्रक :

वैभव प्रिंटींग प्रेस

प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई–४.

※

प्रकाशन :

२३–७–१९८८

कल्चरल सेंटर, माटुंगा.

श्री गणेशाय नमः

—गुं. फ. आजगांवकर

' श्रीगणेशाय नमः '

माझ्या आईने लहानपणी मला पाटीवर वरील धडा लिहून दिला होता.

अशा प्रकारें माझ्या शिक्षणाची सुरवात झाली.

देवपुजेची सुरवात गणेशपूजन करून होई.

ॐ नमो जी आद्या, वेदप्रतिपाद्या असे ज्ञानेश्वरांनी गणेशाला उद्देशून म्हटले आहे.

महाभारत ग्रंथ जरी व्यासांनी सांगितला तरी त्याचे लेखन गणपतीने केल्याचे प्रसिद्ध आहे.

सुखकर्ता, दुःखहर्ता आणि बुद्धिदाता म्हणून गणेशाचे केलेले गुणगायन कोण विसरेल ?

आपल्या आईला प्रदक्षिणा करून पृथ्विप्रदक्षणेचे श्रेय मिळविणारा हा गणेश ! नजिक **पाली** या गावीं स्वयंभू गणेशाचे देवस्थान आहे.

माता पित्याने गणेश हेच नाव दिवेकर यांना ठेवले. त्यांच्या पणजोबांचे हे नाव !

नाना विद्यांचा—नाना कलांचा—विद्या सुख दाता असा श्री गणेश !

गणेश माधवराव दिवेकर ह्या सार्थ नावाने दादासाहेब सर्वांना चिरपरिचीत !

त्यांचा जन्म २१ जुलै १९१३ मध्यें झाला.

२१ जुलै १९८८ मध्यें त्यांना ७५ वर्षें पूर्ण होतात.

ह्या निमित्ताने त्यांचा अमृतोत्सव स्वागत सोहळा दादर माटुंगा कल्चरल सेंटरच्या सभागृहांत होत आहे.

ग. मा. दिवेकरांचा मित्रपरिवार याप्रसंगी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा व्यक्त करील.

'जनतेच्या कल्याणासाठी करण्यांत आलेले लोकोपयोगी कायदे कितपत फलद्रुप झाले आहेत?' या विषयावर विचारवंत वक्ते बोलणार आहेत. माननीय दादासाहेब याप्रसंगी आपले विचार मांडतील.

अध्यक्षांच्या हस्तें दादासाहेबांना शाल व श्रीफळ देऊन सत्कार होईल.

ब्राह्मण सभा, मुंबई मराठी साहित्यसंघ, दादर माटुंगा कल्चरल सेंटर माहीम इ. संस्थांचे सहकार्य निश्चित झाल्यावर सुप्रीम कोर्टाचे निवृत्त न्यायमूर्ती व्ही. डी. तुळजापूरकर यांस अध्यक्षस्थान घेण्याची विनंति केली. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी पाहुणे म्हणून उपस्थित रहाण्याचे मान्य केले. ज्येष्ठ कायदेपंडित माधवराव परांजपे यांना निमंत्रित केलें. ह्या समारंभाचे निमित्त साधून एका महत्त्वाच्या विषयावर एक चर्चा आयोजित करायाचे ठरले. असा हा दुग्धशर्करा योग आला!

ह्या गौरव समारंभाच्या निमित्ताने एक छोटेसे गौरव पुष्प काढण्याचे मी निश्चित केले पण वेळ अगदीच कमी असल्याने माझा प्रयत्न कितपत यशस्वी झाला हें सांगणे कठीण आहे.

सुप्रसिद्ध साहित्यसेवक **वामन रावजी ढवळे** आणि साहित्यसंघाचे दीर्घकाल पदाधिकारी राहिलेले कार्यवाह **दि. वि. आमोणकर** ह्या दोघांचा माझ्यावर फार लोभ होता. माझ्या आतेने आपल्या उद्योगधंद्याचा एक विश्वस्तनिधी उभारला होता व त्याची सर्व जबाबदारी माझेवर टाकली होती. तिच्या मृत्यूनंतर तिच्या सर्व वारसांनी माझ्याविरुद्ध दावे केले, एक्सपार्टी कोर्ट रिसीवर मिळविला, आणि मी एकाकी पडलों. माझे मित्र वामनराव ढवळे आणि श्री. आमोणकर यांनी मला बरोबर घेऊन दिवेकरांच्या चेंबरमध्यें धाव घेतली. त्या दिवसापासून दिवेकर हे माझे सॉलिसिटर झाले. त्या सर्व केसीस एकामागोमाग जिंकून त्यांनी धंद्याची सूत्रें माझ्या हाती येतील असे केलें. एखाद्या महाराष्ट्रीय माणसाला संकटकालांत उपयोगी पडणारी 'दिवेकर आणि कं.' ही एकमेव सॉलिसिटर फर्म असावी.

त्यानंतर गेल्या दहा वर्षांत मी अनेक महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित केले. आमोणकर आणि ढवळे यांच्या निधनानंतर डायबेटीसने मी जेरीस आलो. पण त्यांतहि वा. रा ढवळे; व्यक्ति आणि कार्य या नावाचे एक संदर्भ पुस्तक प्रकाशित करून माझ्या मित्राची स्मृति मागे राहील येवढें काम मी केले.

दिवेकरांचा एकूण स्वभाव, त्यांची अभ्यास् वृत्ती, वाङ्मयासंबंधी त्यांना असलेली आवड आणि गरिबांबद्दलचा त्यांचे जवळ असलेला जिव्हाळा यामुळें मी त्यांना एक आदर्श पुरुष म्हणून मानीत आलों. त्यांच्या सहवासाने कायद्यावरील अनेक पुस्तकें वाचण्याचा मला नाद लागला. सर्व सामान्य जनतेला कायद्यांचे ज्ञान असणे फार आवश्यक आहे याची मला तीव्रतेने जाणीव झाली.

प्रस्तुतच्या गौरवपुष्पांत माननीय दिवेकर यांनी कित्येक वर्षांपूर्वी संतकवि पंतमहाराज बाळेकुंद्री यांचेवर एक लेख लिहून दिलेला होता तो प्रसिद्ध केला आहे. प्राचीन मराठी संतकवींत त्यांचें स्थान काय हें दिवेकरांनी विषद केले आहे. त्यांच्या लेखनाचा तो नमुना आहे.

प्रस्तुत पुष्पांत दादर माटुंगा कल्चरल सेंटरचे जुने कार्यकर्ते श्री. मनोहर वागळे यांचा लेख वाचकांना आवडेल अशी आशा आहे. दिवेकरांची अनेक वैशिष्ठ्यें त्यांत चांगलीं रेखाटली आहेत. दिवेकरांची जीवनगाथा ही अनेकांस एखाद्या दीपस्तंभासारखी धीर देण्यास समर्थ आहे असा मला विश्वास वाटतो. ह्या छोट्याशा पुस्तिकेने दादासाहेबांचे ओझरते जरि दर्शन झाले तरी आजपर्यंतचे अबोल, अव्यक्त, विवेकाने सदा अवगुंठित राहिलेला असा एक जीवन प्रवाह जो माणुसकीने सदा भरून राहिलेला, ज्याचा उपयोग मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय जनतेला आज चार तपांहून अधिक काल होत आहे, त्याचें दर्शन होईल.

जी. एम. दिवेकर यांचे एक छोटे आत्मनिवेदन पुस्तकांत मी समाविष्ट करण्यात यशस्वी झालों. त्यांच्या चरित्राचा अत्यंत संक्षिप्त असा हा नमुनेदार आराखडाच आहे. दिवेकरांच्या लोकोत्तर योग्यतेचा जो भास आजपर्यंत होई तो किती खरा आहे हें आतां प्रत्येकास पटेल. त्याचे थोडेसे श्रेय कोणी मला दिले तर त्याबद्दल मी समाधानी आहे. दादांचे ऊर्वरीत आयुष्य सुखाचे, समृद्धीचे, आणि दैवी संपत्तीने युक्त असे रहावें अशी परमेश्वराकडे प्रार्थना आहे. या कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थाचा व त्यांच्या कार्यकर्त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

— o —

एक आदर्श जीवन

गुरुवर्य ग. मा. दिवेकर यांच्या वयाला दिनांक २१।७।८८ ला ७५ वर्षे पूर्ण झाली. दिनांक २३।७।८८ रोजीं त्यांच्या अमृतोत्सवानिमित्त एक गौरविका प्रकाशित होत आहे. त्यासाठी माझी ही मानवंदना !

मी १९५९ सालीं गव्हर्नमेंट सर्व्हिसमध्यें असतांना श्री. दिवेकर गव्हर्नमेंट सॉलिसिटर म्हणून काम पहात होते व मी त्यांच्या हाताखालीं काम करीत होतो. श्री. जी. एम. दिवेकर यांच्या प्रोत्साहनाने मी १९६२ साली एल्.एल्. बी झालो. १९६३ मध्यें दिवेकरांनी गव्हर्नमेंटचे काम सोडून दिले व त्यांच्या मागोमाग मीही १९६४ मध्यें नोकरीचा राजीनामा दिला. कामासाठीं बराच फिरलो व शेवटी सॉलिसिटर दिवेकर यांचेकडे जुनियर असिस्टंट म्हणून कामाला राहिलों. आज जे काहीं स्थान मला प्राप्त झाले आहे त्याचे श्रेय निःसंशय दिवेकर साहेबांकडे जातें. मी त्यांना गुरुस्थानी मानत आलो आहे. दिवेकरांचा निर्भिड स्वभाव, स्टेट्फॉरवर्डनेस, पैशाच्या मागे कधीहि न लागणे आणि आलेल्या प्रत्येकाला मदत करणे हा त्यांचा स्वभाव ! अशीलाचा त्यांच्यावरचा विश्वास यामुळें त्यांच्याकडे दूरदूरवरून लोक येत असतात. तें कधी कोणावर रागावल्याचे मी पाहिले नाहीं. केवळ पैशाच्या मागें लागू नये तर सामाजिक कर्तव्य करीत रहावे हें मी त्यांचे सहवासांत शिकलों.

दिवेकरांबद्दल लिहिण्यास शब्द कमी पडतात. त्यांच्याबद्दल एक गोष्ट निर्विवादपणे खरी आहे कीं ते एक उदार, निस्पृह व सदा दुसऱ्यांना मदत करणारी व्यक्ती आहे असे मला वाटते. त्यांनी मला फार फार मदत केली आहे व माझ्याप्रमाणें इतरांना पण त्यांनी वेळोवेळी मदत केली आहे. काम करण्याची विलक्षण शक्ती त्यांच्यांत आहे आणि अजून देखील १०–१२ तास ते काम करतात व सारखे वाचत असतात.

मी त्यांना सुखी जीवन चिंतितो.

— ॲड्. म. कृ. नेसरी

छाया देणारा महान वृक्ष

— दाजी भाटवडेकर

गुणप्रवालं विनयप्रशाखं विस्रम्भमूलं महनीयपुष्पम् ।
तं साधुवृक्षं सुगुणैः फलाढ्यं सुहृद्विहंगाः सुखमाश्रयन्ति ॥

— मृच्छकटिकम्

आपल्या सुप्रसिद्ध संस्कृत नाट्यकृतीत कविराज शूद्रकाने वसन्तसेनेच्या तोंडीं चारुदत्ताच्या गुणांचे, स्वभावाचे वर्णन करणारा वरील श्लोक घातला आहे. चारुदत्त हा एक छाया देणारा महान वृक्ष आहे अशी कल्पना करून वसन्तसेना म्हणते की ज्या वृक्षाला गुणरूपी मोहोर येतो, ज्याच्या शाखा म्हणजे अंगचा विनय, विश्वास हा ज्याची मुळें आहेत, ज्याला मोठेपणाची गेंदवाज फुलें येतात, उत्तमोत्तम गुण ही ज्याची सुमधुर फळे आहेत अशा चारुदत्तरूपी वृक्षाच्या आश्रयाला मित्रांचे थवेच्या थवे पक्षांप्रमाणे विसाव्यासाठीं लोटावे यांत आश्चर्य काय ! एवंगुणविशिष्ट चारुदत्ताची भूमिका संस्कृत मृच्छकटिकम् या ब्राह्मणसभेने सादर केलेल्या प्रयोगांत मित्रवर्य सॉलिसिटर गणपतराव दिवेकर यांच्या वाट्याला यावी हा एक सुभग योगायोगच. ही भूमिका श्री. गणपतरावांच्या अंगाला खास शिवलेल्या अंगरख्याप्रमाणे फिट्ट बसावी व त्यानी ती नितान्त सुन्दर आणि यशस्वीरीत्या वठवावी हे स्वाभाविकच होते. कारण श्री. गणपतरावांच्या ठायीं, त्यांच्या प्रकृतीत वर वर्णन केलेले गुण निसर्गतःच वसत होते.

अशा सॉलिसिटर दिवेकरांचा आणि माझा सुमारें गेल्या ३५ वर्षांचा परिचय आहे. ब्राह्मणसभा व मुंबई मराठी साहित्यसंघ या संस्थांच्या कार्यक्षेत्राच्या संदर्भात हा परिचय दिवसेदिवस घनिष्ट आणि दृढ होत गेला. संयमी, सुशील, शान्त, चारित्र्यवान, अबोल पण मृदुभाषी, दृढव्रत आणि लोकसंग्रहाची स्वाभाविक ओढ या श्री. गणपतरावांच्या अनमोल स्वभाव-विशेषांची मला या दीर्घ कालांत चांगलीच जाणीव झाली; व मी मित्रत्वाच्या नात्याने त्यांच्याकडे आकर्षित झालों. त्यांतच श्री. गणपतरावांचे नर्मविनोदाचे बोलणे व समाजसेवेचा ओढा यांचीही ओळख पटली.

" विकार हेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः " या संस्कृत वचनांत श्री. गणपरावांचे प्रकृति–वैशिष्ठ्य गोविले आहे. मनःक्षोभाची कितीही कारणे निर्माण झाली तरी ज्यांचा विकारवशतेने तोल सुटत नाही; सरतेशवटीं विचारच ज्यांच्या बाबतींत विकारावर मात करतो तेच खऱ्या अर्थाने " धीर पुरूष " या पदवीला पात्र ठरतात हे सुभाषित वचन श्री. गणपतरावांना तंतोतंत लागू पडते.

Those persons alone can lay claim to be classed as Steady, Firm and Patiently courageous who do not allow themselves to be distracted, disturbed and become off the balance whan confrunted ley circumstances causing emotional distress & imbalance / excitement through the rule of passion.

' जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ' या संतश्रेष्ठ तुकोबांच्या उक्तीप्रमाणे व्यावहारिक आणि कौटुम्बिक जीवन निष्ठेने, श्रद्धेने व्यतीत करणाऱ्या मित्रवर्य गणपतरावांना—

सुखसमृद्धिरस्तु ।
जीवेत शरदः शतम् ।
य शुभेच्छा !

गुरुवर्य ग. मा. दिवेकर

श्री. गं. मा. दिवेकर

(आत्मनिवेदन)

माझे मित्र श्री. गुं. फ. आजगांवर यांनी मला माझ्यासंबंधी 'दोन शब्द' लिहावयास सांगितले आणि नाखुषीनें मी लिहावयास बसलो. पण पहिलाच प्रश्न मनापुढे उभा राहिला कीं माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या जीवनांत लिहिण्यासारखे असें असणार तरी काय ?

दीर्घायुष्य ही ईश्वराची कृपा

मोठ्या लोकांच्या जन्मतिथीला फार महत्व असतें पण माझी जन्म तारीख २१ जुलै १९१३ आहे, याला महत्व इतकेंच कीं त्यावरून वेळोवेळीं माझ्या वयाची वर्षे मला मोजता येऊं शकतात. तेव्हां २१ जुलै १९८८ रोजीं माझी वयाची ७५ वर्षे पूर्ण होतात असें म्हणता येतें. वयाचा व शहाणपणाचा अगर मोठेपणाचा अन्योन्य संबंध असता तर कोणताही दगड कोणत्याही माणसापेक्षां जास्त शहाणा अगर मोठा ठरेल अशा अर्थाचें बर्नार्ड शॉ यांचे एक वाक्य आठवतें. तेव्हां पंचाहत्तर वर्षे पुरी झाली याला कांहीं महत्व नाहीं. कालिदासानें म्हटलें आहे कीं "मरणं प्रकृतिः शरीरिणाम्। विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ॥. तेव्हां जीवन ही विकृति व मरण ही प्रकृति आहे. पण तोच कवी पुढे म्हणतो कीं "क्षणमप्यवतिष्ठतेश्वसन् यदि जन्तुनर्नु लाभवानसौ". तेव्हां क्षणच काय पण ७५ वर्षे जगलो हें माझ्या दृष्टीनें भाग्याचे चिन्ह म्हटलें पाहिजे. "भाग्यस्य दैन्यस्य न कोऽपि दाता। स्वयमेव कर्ता स्वयमेव भोक्ता" असें जरी

योगवासिष्ठांत म्हटलें असलें तरी दीर्घायुष्य ही ईश्वराचीच कृपा अगर शाप आहे असें सामान्य माणूस म्हणणारच.

शिक्षणाची वाटचाल

मोठे लोक आपल्या आत्मचरित्रांत अगदी जन्मल्यापासूनच्या हकीगती सांगू शकतात. पण मला मात्र माझ्या लहानपणांतील लहानमोठ्या गोष्टी कांहीही आठवत नाहींत. एवढीच पुसट आठवण आहे कीं शाळेंत जाण्याचा आळस, आईच्या व शिक्षकाच्या हातचा मार खाणें व गावांत उनाडणें, हाच पहिल्या दहा वर्षांच्या कारकीर्दीचा सारांश आहे. ही वर्षे माझे गांवी (म्हणजे मु. पडघवली, ता. सुधागड, जि. रायगड) येथें गेली व मराठी चवथी इयत्ता पास झाल्यानंतर पुढील शिक्षणाची सोय नसल्यानें मुंबईकडे धांव घेणें भाग पडले, वडीलांचा मोठा संसार (मला सहा भावंडे आहेत) व आर्थिक परिस्थिति अगदीं कमकुवत त्यामुळें चुलत्याच्या आश्रयाखालीं मुंबईस येऊन राहावे लागले व शिक्षणक्रम सुरु झाला. सन १९३० मधें मॅट्रिक, १९३५ मधें बी. ए. १९३७ मधें एल्. एल्. बी. व १९४० मधें सॉलीसीटर अशा पायऱ्या चढलो. अभ्यासात जरी मी प्रथमश्रेणीचा विद्यार्थी नव्हतो तरी कधीही कोणातीही परीक्षा नापास झालों नाही. या वयांत अभ्यासाची व वाचनाची गोडी लागली ती आज-पर्यंत कायम आहे; अर्थात आर्थिक स्थिति बेताचीच असल्यानें शाळा-कॉलेजच्या जीवनांत अभ्यासाशिवाय अन्य कांहीं करू शकलों नाहीं. खिशांत एकादा रुपयाही असण्याची जिथें वानवा तिथें नाटक, सिनेमा, खेळ वगैरे दुरापास्त असल्यास नवल काय ? घरांतूनही कसले प्रोत्साहन नव्हतें. १९४० साली सॉलीसीटरची परीक्षा उतीर्ण झाल्यावर चुलत्याच्याच ' ऑफिस ' मधे काम करू लागलों. त्याचवर्षाचे अखेर माझा (प्रेम) विवाह झाला. सासरचें कुटुंब सुस्थितींतले होते व जामात अगदींच नगण्य असल्यानें सासुरवाडचा प्रतिसाद मिळण्याची खटपट अगर धडपडही केली नाहीं. पत्नीनें मात्र कोणत्याही परिस्थितींत उत्तम साथ दिली.

एक मान्यवर सॉलिसिटर

मुंबईसारख्या शहरीं 'सॉलीसीटर'चा व्यवसाय करणे, आणि विशेषतः सामान्य स्थितींतील महाराष्ट्रीय माणसानें, हा त्यावेळीं व तत्पूर्वीही फार अवघड गोष्ट होती. या व्यवसायाला मोठमोठे धंदेवाले, कारखानदार, जमीनदार वगैरे उच्चस्तरीय समाजाशी संबंध असणें अतिशय अवश्य होते. आणि हा समाज बव्हंशी महाराष्ट्रीये-तर लोकांचा होता. त्यामुळे मराठी माणसाला या व्यवसायांत डोके वर काढणें कठीण होते. काहीही म्हटलें व निधर्मीपणाचा कितीही डांगोरा पिटला तरी जातीयवृत्ती आपल्या नसानसांतून भिनलेली आहे व आजमीतीला सुद्धा राजकारणांत व्यापारांत

सामाजिक कार्यांत वगैरे सर्व क्षेत्रांत जातीयवाद आपली प्रमुख भूमिका बजावीतच आहे. शिवाय महाराष्ट्रीय माणसाला कोर्टकचेरीची आवड असली तरी त्याकरितां अवश्य असणारी आर्थिक ताकद व मानसिक दानत या दोन्हीं गोष्टींचा पुष्कळसा अभाव होता व अजूनही आहे. अशा परिस्थितींत व कदाचित स्वतःच्या काही वैगुण्या-मुळे पहिली काहीं वर्षें माझा वकिली व्यवसाय आर्थिक दृष्ट्या यथातथाच चालला होता. शेवटीं त्याचा कंटाळा येऊन मी पांच सहा वर्षें नोकरींत घालविली. त्यापैकी चार वर्षें मध्यवर्ती सरकारच्या वतीनें मुंबई वरिष्ठ न्यायालयांत काम करण्याची संधी मिळाली व त्यामुळे व्यवसायांत पुष्कळ अनुभव मिळाला व थोडी फार प्रतिष्ठाही मिळाली; तरीपण नोकरीला लागणारी मानसिक भूमिका मजजवळ नसल्याने मी तेथें रमलो नाही व पुन्हां सॉलीसीटरचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला तो आजतागायत. या कालावधीत दोन वर्षे हायकोर्टांत महाराष्ट्र सरकारचा एक सॉलीसीटर म्हणून व सुमारे सहा वर्षे सिटी सिव्हिल कोर्टांत मध्यवर्ती सरकारचा वकील म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या काळांत मला इतरही पक्षकार पुष्कळ मिळाले व मागील सर्व उणीव भरून काढायला मिळाली. व व्यवसायांत एक मान्यवर सॉलीसीटर व वकील म्हणून स्थान प्राप्त झालें असें मी समजतो. अर्थात मी एक प्रथितयश किंवा अग्रेसर सॉलीसीटर अगर वकील आहे असें म्हणण्याचें धारिष्ट्य करीत नाहीं. या काळांत माझे मित्र कै. एस. व्ही. गुप्ते, ह्या ख्यातनाम वकिलांच्या सहवासांत त्यांनीं १९४७ मधे प्रसिद्ध केलेल्या हिंदू कायद्यावरील ग्रंथाचें संपूर्ण पुनर्लेखन व नूतनीकरण करून नवीन स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची मला संधी मिळाली व त्यांत माझी बरीच वर्षेंही खर्ची पडली. तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्याचें मला मोठे समाधान मिळालें व अनुभवही मिळाला.

मूलभूत तत्वांचे सम्यग् ज्ञान

अठ्ठेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ व्यावसायिक गतकाळाचा विचार केला कीं मन प्रसन्न होते व कष्टीही होते. स्थलकालाच्या अभावीं व्यवसायांत आलेले अनेक चांगले वाईट अनुभव मी सांगत बसत नाहीं. तसेंच मी हाताळलेल्या लहान मोठ्या दाव्यांच्या कथाही लिहीत नाहीं. या कालावधींत अनुभवानें व अभ्यासानें कायद्याच्या मूलभूत-तत्त्वांचें सम्यग् ज्ञान मिळाले तसेंच या व्यवसायांतील जी पथ्यें असतात ती तंतोतंत पाळण्याचा मी प्रयत्न केला आहे याचें मला समाधान वाटते. व्यवसायाच्या व माझ्या प्रतिष्ठेला न शोभणारी अशी एकही कृति माझ्या हातून झाल्याचें मला आठवत नाहीं. पक्षकाराला फसविणे, वाजवीपेक्षां जास्त पैसे वसूल करणें, विरुद्ध पक्षाशी अगर त्याच्या वकिलाशी हात मिळविणी करणें, न्यायाधिशाशी खास ओळख अगर घसण आहे अशी बतावणी करणे, असल्या अनैतिक गोष्टी माझ्या हातून न घडल्याचें मला समाधान आहे. विरुद्ध पक्षाच्या चुकीचा अगर कमजोरपणाचा गैरफायदा घेण्याचा प्रकारही माझ्या हातून कधी घडलेला नाहीं. आधी फी आणि मग काम हे धोरण मी

कधींच अवलंबिले नाहीं आणि "कर्मण्येऽवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" या गीतेच्या तत्त्वज्ञानाचें व्यवहारांत आचरण करण्याचा मी प्रयत्न केला आहे असे म्हणण्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. अर्थात त्यामुळें आर्थिक लाभांश जितका मिळाला असता अगर मिळायला हवा होता तितका मिळाला नाहीं. पण त्याचे मला दुःख नाही. मी जीवनांत पैशाचा लोभ अगर लालसा कधींच केली नाहीं. व माझ्या व्यवसाया व्यतिरिक्त अन्य मार्गाने पैसे मिळविण्याचा कधीं खटाटोप केला नाहीं. एक सुभाषित म्हणते "स तु भवति दरिद्रो यस्य तृष्णा विशाला। मनसि च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्रः"

खंत वाटते

त्याचबरोबर या व्यवसायाची जनतेंत रूढ झालेली नालस्ती व या व्यवसायांत निर्माण झालेले अशिष्ट व अनिष्ट व्यवहार पाहून मन कष्टी होते. वकिलाच्या (आतां सॉलीसीटर व वकील यांत भेद कांहीं नाहीं.) व्यवसायाचें रुपांतर झपाट्यानें धंद्यांत होऊं पाहात आहे. 'इस्टेट ब्रोकर,' 'शेअर ब्रोकर' वगैरे दलालाप्रमाणेंच वकीलही न्यायालयांतले दलाल होऊं पाहात आहेत ही दुःखाची गोष्ट आहे. कांहीं व्यावसायिकां-कडून होणारे गैरप्रकार पाहिले अगर ऐकिले कीं या व्यवसायाचीच लाज वाटूं लागते. "कालाय तस्मै नमः" जिथें सर्व समाजच गैरव्यवहारानीं व अप्रामाणिकतेनें ढवळून निघत आहे तेथें वकील व्यवसाय अपवाद कसा ठरेल?

कलानंदाचा आस्वाद

वास्तविक वकिलीचा व्यवसाय इतका वेळखाऊ व रुक्ष आहे कीं हा व्यवसाय करणाऱ्याला जीवनांतील अन्य क्षेत्रांत लुडबुड करावयाला वेळ मिळणे कठीण. तरीपण मी अशी लुडबुड पुष्कळच केली आहे. लहानपणापासून मला नाटक, संगीत, खेळ, साहित्य या विषयांची आवड, पण त्या क्षेत्रांत अभ्यास करण्याची पैशाच्या व इतर अनुकूल सोयींच्या अभावी मला सुरवातीला संधी मिळाली नाहीं. तरीपण वयाच्या दहाव्या वर्षापासून तो जवळजवळ वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत मी शाळा, कॉलेज, माझे गांव, वगैरे ठिकाणी नाटकांतून–मराठी व संस्कृत अनेक लहान मोठ्या स्त्रीपुरुष भूमिका केल्या आहेत. अनेक नाट्य–प्रयोगही पाहिले आहेत. अर्थात मी एक उत्तम नट आहे असें म्हणूं शकत नाहीं. तसेंच उशीरा कां होईना पण वयाच्या चाळीशीनंतर मी शास्त्रीय संगीताचा थोडासा अभ्यास केला व अजून लहानशी शास्त्रीय संगीताची बैठक, ऐकणाराला जांभई न येऊं देतां, करू शकतो. तरीपण मी एक गायक आहे असे म्हणू शकत नाही. खेळांची आवडही असल्याने मी वयाच्या सुमारे साठाव्या वर्षापर्यंत नित्यनियमाने टेनिस वगैरे खेळ खेळत असे.

याचा अर्थ मी उत्तम क्रीडापटु आहे असा मात्र नव्हे. नाटकांच्या हव्यासामुळें मी माझ्या एक मित्राच्या सहकार्यानें एक नाटकही लिहिलें व स्वतःच प्रयोग करून त्यांत खलनायकाची भूमिका केली. कॉलेजमधें असतांना काव्याचा छंद लागला व पांचपन्नास कविताही रचिल्या पण व्यवसायांत पडल्यावर तो छंद मागे पडला. हे सर्व सांगण्याचा हेतू एवढाच की वकिलीच्या वाळवंटांत काम करीत असतांनाही मनाचा अगर भावनाशीलतेचा ओलावा नाहींसा होऊं दिला नाही व जीवनांत कलानंदाचा आस्वाद नेहमी घेत राहिलो. त्यामुळें जीवन आनंदी राहिलें. "साहित्य संगीत-कलाविहीनः साक्षात् पशुः". ही भर्तृहरीची धारणा मलाही मान्य आहे. जीवन आनंदी करावयाचे असेल तर एकाद्या कलेचा हव्यास नाही तरी निदान आवड असणे अगदी आवश्यक आहे. त्याकरितां प्रथितयश कलाकार होण्याची आवश्यकता नाही. उलट कला हा ज्याचा व्यवसाय आहे त्याला ती कला कितपत निर्मळ आनंद देते याची शंकाच आहे. कारण व्यवसाय म्हटला की पैशाचा लोभ, व्यावसायिक चुरस व हेवेदावे वगैरे अनुषंगिक सुखदुःखें आलीच. मात्र मी कोणत्याच एका कलेला वाहून न घेतल्याने "Jack of all trades and master of none' अशी कांहींशी माझी स्थिति झाली आहे.

सार्वजनिक कार्य

सार्वजनिक कामाची (राजकारण सोडून) आवड असल्यानें मुंबईत व माझे गांवी असलेल्या कांहीं संस्थांशी माझा निकट संबंध आला व त्यांत मी निरपेक्ष-बुद्धीने काम केले व करीत आहे. लायन्स क्लबच्या साहाय्याने माझे गांवी व तेथील परिसरांत कांहीं वर्षे लोकोपयोगी कामही पुष्कळ केले. विशेषतः माटुंगा जिमखाना ही क्रीडासंस्था व दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्र ही शास्त्रीय संगीताला वाहून घेतलेली संस्था ह्या माझ्या अगदीं जिव्हाळ्याच्या संस्था आहेत. दोन्ही संस्थामधून मी गेली अनेक वर्षे प्रत्यक्ष काम केले आहे व त्यांच्या उर्जितावस्थेच्या कार्यात माझा हातभार नक्कीच आहे. माझ्या आयुष्यांतील पुष्कळसा काळ मी या संस्थेंत घालविला आहे व त्यांत मला अतिशय समाधान लाभले आहे.

चारित्र्य महत्वाचे

मी प्रसिद्ध व्यक्ति नाहीं व प्रसिद्धीची हाव कधीच केली नाही. "घटं भिन्द्यात्पटं छिन्द्यात कुर्यात रासभनिः स्वनम् येन केन प्रकारेण प्रसिद्ध पुरुषो भवेत" हे धोरण मी कधी ठेवले नाहीं. प्रसिद्धी ही चांगल्या अगर वाईट कर्तृत्वाने मिळत असते. जीवनात चारित्र्य महत्वाचे की कर्तृत्व महत्वाचे हा एक मतभेदाचा प्रश्न असू शकेल. आजकाल चारित्र्यापेक्षां कर्तृत्वाला जास्त महत्व दिले जात आहे व चारित्र्य ही खाजगी बाब असून समाजाला त्याच्याशी कांहीं कर्तव्य नाही; अशीच विचारसरणी

आहे आणि म्हणून चारित्र्यहीन असूनही केवळ एकाद्या क्षेत्रांत कर्तबगारी केलेल्या व्यक्तीचा नेहमी उदोउदो व प्रसिद्धी होत असते. मी आयुष्यांत चारित्र्याला जास्त महत्व देत आलो आहे. केवळ कर्तृत्वाला नाहीं. अर्थात् चारित्र्य व कर्तृत्व यांचा संगम जेथे असेल ती व्यक्ति निश्चितच थोर समजली पाहिजे. चारित्र्यहीन व्यक्तींचा समाज केंव्हांतरी अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही.

"स जीवति गुणो यस्य धर्मो यस्य स जीवति
गुण धर्मो विहीनः यो निष्फलं तस्य जीवनम्"

— ० —

गेली जवळजवळ ३४ वर्षे केवळ शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रांतच वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणारी दादर माटुंगा कल्चरल सेंटर ही संगीत क्षेत्रांतील एक अग्रेसर संस्था! तिची खास ओळख करून द्यायला पाहिजे अशांतला भाग नाही.
ह्या सेंटरमधील सॉलिसिटर श्री. गणपतराव दिवेकर ह्यांचा सहभाग गेल्या कित्येक वर्षापासूनचा—कार्यकारी मंडळाचे सदस्य, पदाधिकारी अशा नानाविध भूमिकांतला! सेंटरमधील त्यांच्या कर्तृत्वाची, व्यक्तिमत्वाची ही छोटीशी झलक...

सुरेल, तालबद्ध

एक सुविद्य रसिक आणि सद्गृहस्थ!

—मनोहर वागळे

"कुठल्याही संस्थेत कुणीतरी एखाद दुसराच पोटतिडीकेनं काम करतो. बाकीचे नांवासाठी किंवा नांवापुरतेच असतात—"

अनेक संस्थांतून पदाधिकारी, कार्यकारी मंडळाचे सदस्य, कायदाविषय सल्लागार अशा विविध 'भूमिके'तून, अत्यंत जिद्दीनें, निष्ठापूर्वक विधायक कार्य करणाऱ्या सॉलिसिटर श्री. गणपतराव दिवेकर ह्यांचं अनेक वर्षांच्या अनुभवांतून प्रकट झालेलं हे संस्थाविषयक तत्त्वज्ञान! एक चपलख, घरंदाजी "ख्याल"!

गेली कित्येक वर्षे साहित्य, संगीत, नाट्यक्षेत्रांतील त्याचप्रमाणें सामाजिक संस्थांमधून सतत कार्यरत असलेलं, हौसेची वीण व परिश्रमाचा पोत लाभलेलं एक झपाटलेलं व्यक्तिमत्व म्हणजे श्री. गणपतराव दिवेकर! त्यांचं झपाटलेपण तीव्रतेनं जाणवणारं! एक कळकळीचा, तळमळीचा, "जो लोककल्याण साधावया" अशा निर्मळ वृत्तीचा एक प्रामाणिक श्रमदाता!

त्यांच्यासारखे साधे, सरळ नि स्वच्छ विधायक कार्यकर्ते कुठल्याही संस्थेत शोभून दिसतात. ते स्वतः तर शोभतातच. परंतु ते संस्थेची व तिच्या कार्याची शोभा वाढवतात. म्हणूनच श्री. दिवेकरांचं एकूण व्यक्तिमत्व व कर्तृत्व ही दादर माटुंगा कल्चरल सेंटरची शान आहे!

"उतला नाही; मातला नाही
घेतला वसा टाकला नाही—"

प्रत्येक संस्थेत कांही कार्यकर्ते कामसांगे असतात—दुसऱ्यांना कामं सांगून, स्वतः स्वस्थ बसून यशाचे धनी होऊन फुकटचा भाव खाणारे! 'लढनेको तुम और खानेकु हम' अशा भावनेनं दुसऱ्यांनी दळलेल्या पीठावर रेघोट्या मारून, व्यासपीठावर सन्मान स्वीकारून मिरवणारे! तर कांहीं सांगकामे असतात—सांगितलं तेवढं नि तसंच काम करणारे! दुसऱ्यांनी नांवाजून सांगण्यासारखी कामं करणारे सॉलिसिटर गणपतराव दिवेकर विरळाच! श्री. दिवेकरांनी दुसऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून, तिसऱ्यानेंच तिचा चाप ओढावा अशी सोयिस्कर व सुलभ वृत्ती स्वप्नांतही बाळगली नाही! कुटलंही काम करण्याची त्यांची वृत्ती "उतला नाही, मातला नाही, घेतला वसा टाकला नाही—" हीच असते! कुटलाही आडपडदा मनांत न ठेवतां, वेळेप्रसंगी पड्द्या आडून त्याचप्रमाणें पडद्यासमोर कामं करून सुद्धा केलेल्या कामगिरीच्या श्रेयाबद्दल सदैव 'पडदानशीन' राहणारे निर्मल आचाराचे निर्मळ विचाराचे श्री. दिवेकर आजच्या संस्कारहीन, भेसळ युगांतील एक 'अनवट' रागच!

'प्लीड' करण्यापेक्षां
'लीड' करणारे कार्याध्यक्ष

कुठल्याही संस्थेच्या कार्याध्यक्षाची कसोटी लागते ती कार्यकारी मंडळाच्या सभेत! कुठल्याही लहानसहान मुद्यावर कोर्टातल्या वादी, प्रतिवादी सारखे पक्ष असूं शकतात. साध्यासुध्या मुद्यावरील चर्चा, वादाच्या धुराळ्यांतून वैयक्तिक शेरे, ताशेऱ्यांच्या धुराळ्यांत कधीं जाईल ह्याचा नेम नसतो! अशा 'कठीण समयी' कामास येणारी एकच व्यक्ति असते—व्यक्ति निरपेक्ष निःपक्षपाती दिलदारपणा दाखवणारा समंजस कार्याध्यक्ष!

श्री. दिवेकर अशा तऱ्हेची परिस्थिती हाताळण्यांत पारंगत आहेत. ते एक नर्मविनोदी पण मिष्किल वक्ते आहेत. खोचक असून खवट नाहीत, प्रसंगी तिखट वाटले तरी तिरसट नाहीत, रोचक नक्कीच आहेत, पण बोचक नाहीत. कांही वेळां परखडपणें रोख ठोक बोलत असले तरी त्यांचा रोख कुणाला तरी ठोकण्यासाठी आहे असं वाटत नाही ! कुठल्याही प्रश्नावर कसलाही पूर्वग्रह न बाळगतां, आपली ठाम मतं, पक्के विचार समर्थपणें 'प्लीड' करून बाजी मारण्याचा सवंग प्रयत्न ते कधीच करत नाहीत !

सेंटरचा कारभार एकमतानं चालणं केव्हांही योग्य ही त्यांची विशुद्ध भावना. पण हे एकमत म्हणजे आपलं एकट्याचं मत नसून सर्वांचं एकमत ही त्यांची जाणीवपूर्वक धारणा ! म्हणूनच आपलं व्यवसायिक कौशल्य पणाला लावून सबंध सभा काबीज करण्याचा खटाटोप न करतां समस्येचा गुंता समंजसपणें सोडवून प्राप्त परिस्थितीतील संस्थेच्या हिताचा मार्ग स्वीकारून सबंध सभा जाणीवपूर्वक 'लीड' करतात आणि 'वादा'चं सौहार्द संवादांत केव्हां रूपांतर झालं ह्याचं भानही वादग्रस्त मंडळींना राहत नाही ! आणि मध्येंच वर्ज्य स्वर लागलेली कार्यकारी मंडळाची सभा समजूतदारपणाची 'सम' अलगद गांठते !

"मी मानपमाना, नच मानितो—"

आजकाल कर्तृत्व गाजत नाही. वाजत नाही. गाजविले जाते. वाजविले जाते. कांहीं माणसं हा मार्ग कधींच चोखाळत नाहीत. त्यांच्या प्रकृतीला ते कधीं मानवतच नाही. त्यांना मान, सन्मान सारं कांहीं आपोआप मिळत जातात. त्याची कीर्ती पसरत जाते, तीही आपोआपच ! त्यांच्यातील सच्चा माणसाची नेहमीच कदर होत जाते. अशा ह्या दुर्मिळ परन्तु सच्चा माणसाचं सुरेल, तालबद्ध प्रतीक म्हणजे श्री. दिवेकर !

गेली कित्येक वर्षे श्री. दिवेकर सेंटरमध्ये आत्मीयतेनें, आपुलकीनें, काम करीत आहेत–पदाधिकारी, किंवा कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून ! ह्या दोन्ही "भूमिका" तून कार्य करतांना त्यांनी कटाक्षानें, आवर्जून दूर ठेवला तो वैयक्तिक मानापमान ! सदैव अंतःकरणांत नितांत बाळगला तो पदरीं आलेल्या सेंटरविषयक कामाचा सार्थ अभिमान !

सेंटरच्या बाहेरचं आपलं तडफदार व्यावसायिक कर्तृत्व, त्यांत सतत मिळवलेलं उज्वल यश ह्याचं अवडंबर त्यांनी सेंटरच्या सहकार्यावर कधीही लादलं नाही. किंबहुना बाहेरच्या जगांत आपण कुणीतरी दखलपात्र महत्त्वाची व्यक्ति आहोत ह्याची साधी चाहूलही त्यांनी कधीं जाणवूं दिली नाही ! उलट अकृत्रिम सहजतेनं त्यांनी भार वाहिला तो सेंटरच्या कार्याचा ! त्यांत मग हे छोटं काम मी कसं करूं ही वृत्ती नाही, त्याचप्रमाणें न पटणारी फालतू कारणं देऊन आपल्या अंगावरची कामं टाळण्याची सवंग वृत्ती नाही ! म्हणूनच सेंटरने पास केलेल्या 'लीस्ट ऑफ डयुटीज्' मधील त्यांच्या नांवे नसलेल्या 'डयुटीज्' ही श्री. दिवेकर कार्याध्यक्ष असूनही निःसंकोचपणें पार पाडतात–वैयक्तिक मानापमान विसरून ! सेंटरच्या

मासिक मैफलीच्या निमंत्रण पत्रिकेची प्रुफं तपासणं, एखाद्या कार्यक्रमाचा वर्तमान पत्रांसाठी पूर्वप्रसिद्धीचा मजकूर तयार करणे, स्वतःच लिहिलेला वार्षिक अहवाल ऑफिसमध्यें टाईप करून घेणें व त्यांची प्रुफे तपासणें इत्यादि बारीक सारीक कामं, स्वतःच्यां मोठेपणाचा कसलाही बडेजाव न मिरवतां ते सहजगत्या पार पाडतात ! सेंटरची सुरश्री केसरबाई केरकरांशी असलेली "नैतिक बांधीलकी–" लक्षांत घेऊन, त्यांची पुण्यतिथी सेंटरमध्यें साजरी व्हावी ह्यासाठी पुढाकार घेऊन कार्यक्रमाच्या वेळीं सभागृहांत सतरंज्या सुद्धां ते बिन दिक्कत घालतात ! कोणामुळेही सेंटरचं काम अडतां कामा नये हाच ह्यामागचा निकोप व निरोगी उद्देश !

श्री. दिवेकर हे रंगभूमीवरचे एक नावाजण्याजोगे अभिनेते ! Roles are not small but the actors are small आणि the show must go on– ही रंगभूमीच्या संदर्भा-तील दोन ब्रह्मवाक्यें त्यांनी 'हृदयिं धरा हा बोध खरा' अशा उत्कट भावनेनें उरी बाळग-लेली ! म्हणूनच 'कामं छोटी नसतात, कार्यकर्ते छोटे असतात' ही अस्ताई व 'कार्य अखंडितपणें चालू राहीलं पाहिजे' हा अंतरा असलेला 'ख्याल' त्यांच्या नित्याचा रियाजातला ! आणि त्यांच्या पुढचा 'टप्पा' म्हणजे–स्वतःला मोठं करण्यापेक्षां, संस्थेला मोठं करायला हवं ही अनमोल धारणा !

सेंटरच्या समारंभप्रसंगी कार्याध्यक्षांऐवजी दुसऱ्यांनी भाषण केलं तरी त्यांना त्याची खंत नसते. तसंच अशा प्रसंगी अगदी आयत्या वेळीं भाषण करण्यास सुचवलं तरी त्यांना त्याचा खेद नसतो. "हर्ष खेद ते मावळले" अशा निरागस, निरामय अवस्थेंत रममाण झालेले श्री. दिवेकर "आम्ही खुर्चीचे गोंधळी" ह्या जातीचे खूर्चीबहाद्दर नाहीतच मुळी सेंटरची कामं जबाबदाऱ्या 'मी मानापमाना, नच मानितो' अशा स्पृहणीय वृत्तीने पार पाडणारे ते एक विनयशील, क्रीयाशील बर्चीबहाद्दर आहेत !

त्यांतूनही अपूर्वाईची गोष्ट म्हणजे आपण सेंटरमध्यें काय काम करून राहिलो आहोत ह्याची बाहेरच्या जगांत जाणिवपूर्वक अवास्तव, सवंग जाहिरात तर नाहीच उलट त्याचा जरासुद्धां थांगपत्ता लागणार नाही ह्याची त्यांनी कटाक्षाने घेतलेली दक्षता ! एकूण प्रसिद्धीपेक्षां त्यांना सिद्धीचीच ओढ अधिक !

" अवघें पाऊणशें वयमान—"

त्यांच्या पंचाहत्तरीचा अमृतमहोत्सव !

कुसुमाग्रजांना प्रश्न पडला होता—" पंचाहत्तरीला अमृतमहोत्सव कां म्हणतात ?

पंचवीशीला रौप्य, पन्नाशीला सुवर्ण, आणि साठीला हीरक म्हणतात.

मूल्यवान वस्तूंचे वास्तव येथें संपतं !

आणि आपण प्रवेश करतो अमृत नांवाच्या एका काल्पनिकांत.

जे म्हटलं तर असतं. आणि कितीही म्हटलं तरी अजिबात नसतं. "

ज्यांच्या स्वभावांतच व कर्तृत्वांत तारुण्याचा नखरा व जोश आहे ते श्री. दिवेकर पंचात्तर वर्षाचे झाले हे नाही खरं वाटत ! पस्तीस वर्षाच्या तरुणाच्या उत्साहाने, उमेदीने ते सर्वत्र वावरतांना दिसतात !

खरं तर श्री. दिवेकरांसारख्या चिरतरुण, सदा कार्यमग्न कार्यकर्त्यांचे वाढदिवस साजरे करू नयेत ! कारण उगीच त्यांच्या खऱ्या वयाची चाहूल लागते. त्याची तशी आवश्यकता नसते. त्याची तारुण्य–सुलभ प्रवृत्ती, कामाची तडफ आणि उरक पाहिली तर "अवघें पाऊणशें वयमान" झाले तरी ते "म्हातारा इतुका न–" वाटत नाहीत आणि तसे ते वाटूही नयेत !

"प्रौढत्वीं निज शैशवास जपणें"

माणसाची इच्छा असो वा नसो दरवर्षी तो वयानं वाढतच जातो. माणसानं वयानं पौढ व्हावं, वृत्तीनं नव्हे ! तरुणाला वय असलं तरी तारुण्याला वय नसतं तारुण्याला एकच गुण ठाऊक असतो–सतत तारुण्याचा ! म्हणूनच कांहीं माणसं दरवर्षी वयांत येतात, तर कांही दरवर्षी वयातीत होत जातात ! ह्याही बाबतीत श्री. दिवेकर पहिल्या वर्गातले !

"प्रौढत्वी निज शैशवास" हा केवळ कवींचाच असलेला बाका त्यांच्या अंगी भरपूर आहे. जीवनांतील आनंद रसिकपणें उपभोगण्याची त्यांची वृत्ती ! म्हणूनच वकिलीचा कांहींसा रुक्षव नीरस असा पेशा सांभाळूनही, त्यांत उज्वल यश संपादन करूनही साहित्य, संगीत, नाट्य आदि ललीतकलांचा ते मनमुराद आनंद उपभोगू शकतात !

त्यांचं नेहमींचं शालीन वागणं आणि प्रसन्न बोलणं हेंच त्यांचं तारुण्य आहे. आणि ही दोन्हीही त्यांना सोडून गेलेली नाहीत. त्यांचं शालीन वागणं आणि कुलीन बोलणं पाहिलं कीं पाहणाऱ्याचं वाढतं वयही ओसरून जातं !

व्यवसायाने सॉलिसिटर आहेत हे सांगूनही खरं वाटणार नाहीत इतके साहित्य, संगीत व नाट्य ह्या ललितकलांमध्ये तल्लीन झालेले सॉलिसिटर श्री. दिवेकर हे एक गुणी, रसिले कलावंत– "साहित्य संगीतकला निपुणः" असे ! मनापासून आवड असली आणि योग्य ती संधी, जाणकारी मार्गदर्शन, चोखंदळ प्रोत्साहन मिळालं तर प्रपंच व व्यवसाय सांभाळूनही जाणत्याकडून वाहवा घेण्याइतप कला संपादन करता येते हे त्यांनीं निर्विवादपणें सिद्ध करून दाखवलंय !

" अजूनी खुळा हा नाद "

मखमखलीचा पडदा उघडतांच हिरव्या चादरीवर प्रकट होणारं नाट्य श्री. दिवेकर नेहमीच कौतुकानं, रसिकतेनं व चोखंदळपणें पाहत आले ! नाटकाचा " अजूनी खुळा हा नाद पुरेसा कैसा होईना—" असं तीव्रतेनं वाटल्यामुळें त्यांनी नाटकांतून काम करायला प्रारंभ केला व ते संस्कृत, मराठी नाटकांतून चमकले !

पडघवलीला उत्सवाच्या प्रसंगी मराठी नाटकं बसवून त्यांत हौसेने काम करणारे श्री. दिवेकर मृच्छकटिकम्, स्वप्नवासवदत्ता, वेणीसंहारम् ह्या नाटकांतून नांवारूपास आले ! " मी सुहासिनी मुळगांवकराबरोबर हिरो म्हणून काम केलंय् " असं खाजगीत मिष्किलपणें पण सार्थ अभिमानानें ते सांगतात ! स्वतःच्या अमृतमहोत्सवी वर्षांत बालगंधर्वजन्मशताब्दी निमित्त " रंगगंधर्वा " ची कीर्तनाच्या माध्यमांतून " नमन नटवरा " ही झलक ते अत्यंत तडफेनें पेश करतात ! बालगंधर्वांच्या रंगभूमीवरील व वास्तव जीवनांतील विविध भूमिका आपल्या ह्या एकपात्री कार्यक्रमांतून समर्थ निवेदनासहित सादर करतांना भाबूक " मायबापांनी " ह्या " राजहंसा " चं निव्वळ कौतुक करून गोडवे गाण्यापलिकडे दुसरी कोणतीही जबाबदारी आवर्जून उचलली नाही हेंही स्वच्छपणें, स्पष्टपणें बजावून सांगण्याचं अनमोल धैर्यही दाखवतात !

" प्रथम सूर ताल—"

व्यवसायपरत्वें कायद्याचा कीस काढीत, आक्रमण मुद्याच्या हरकती, बचावाचे चपखल खटके ह्यांत निपुण असलेले सॉलीसीटर श्री. दिवेकर फुरसतीच्या वेळांत संगीताचा रियाज करतांना, संगीतातील 'कायदे' जोपासीत, स्वरांच्या हरकती, तानांच्या लयबद्ध खटक्यांनी विश्रांतीचे क्षण " सुख झाले हो साजणी " अशा नितान्त वृत्तीने सार्थकी लावतात !

गाणं हे केवळ हौस, विश्रांती किंवा करमणूक आहे असं ते मानीत नसावेत ! गाणं हे जीवनांत पुरेपूर गुंतलेलं असतं. ते जीवनापासून वेगळं काढतां येत नाही, हीच त्यांची मनोमन धारणा असावी ! ज्याला चांगला स्वर लावतां येतो किंवा लागलेला समजतो त्याना दुसऱ्याच्या निखळ तन्मयतेचे अप्रूप असते ! ज्याला सम बरोबर सांपडते किंवा सांपडलेली समजते त्यालासुद्धां आयुष्यांत पुष्कळदां तोल सावरतां येतो. स्वर आणि तल्लीनता, त्याच-प्रमाणें ताल आणि तोल ह्यांचं कुठंतरी सूक्ष्म, तरल असं नातं आहे. आणि नेमक्या ह्याच गोष्टीची प्रत्ययकारी जाण असल्यामुळें सार्वजनिक क्षेत्रांत विधायक काम करतांना ते वाता वरण यत्किंचितही बेसूर किंवा बेताल होऊं देत नाहीत !

इतकंच नव्हे तर, त्यांच्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ता ह्या दोन व्यक्तिमत्वांचा एक अनोखा जोड राग त्यांच्यातच निर्माण होतो. झाडाला फांद्या फुटल्यासारखी दोन वेग-वेगळीं व्यक्तिमत्वं न वाटतां, एखादा दुरंगी, दुपेडी गोफ पिळून एकजीव करावा त्याप्रमाणें त्यांच्या दोन व्यक्तिमत्वांचा साथ साथ मिलाफ घडलेला दिसतो ! ह्या अनोख्या समन्वयांमुळे

कार्यकर्त्यांमधील सामर्थ्य आणि मर्यादा ह्यांचा त्यांना अचूक अंदाज लागतो. कार्यकर्त्यांना ताकीद देणारे बोल केव्हां लावायचे आणि त्यांचे प्रांजळ, स्पष्ट बोल निःसंकोचपणे कधीं ऐकायचे ह्याचीही ते मनाशीं पक्केपणानें खूणगांठ बांधतात! कार्यकर्त्यांच्या कामचुकारपणानें स्पष्टपणें पण निष्कपटवृत्तीनें नांवं ठेवण्याची, त्याचप्रमाणें त्यांच्या चांगल्या कामगिरीला उत्स्फूर्तपणे नांवाजण्याची त्यांची निःस्पृह प्रवृत्ती सारख्याच तोलामोलाची! म्हणूनच ते कार्यकर्त्यांच्या व्यथांशी, समस्यांशी, अडचणींशी निर्वाज्यपणें एकरूप होऊं शकतात! सेंटरच्या वर्धापनदिनीं झालेली श्रीमती किशोरी आमोणकर ह्यांची प्रातःकालीन मैफिल. तिला अभूतपूर्व गर्दी लोटलेली! सेंटरच्या प्रवेश द्वारापाशींच प्रवेशासाठीं घोटाळत राहणाऱ्या असंख्य लोकांच्या अडचणींना, तक्रारींना सूचनांना सामोरे जातांना कार्यकर्त्यांची पार तारांबळ उडालेली पाहून आपण कार्याध्यक्ष आहोंत हें क्षणांत विसरत ते तात्काळ स्वतः पब्लिकला सामोरे जाण्याचं धाडस करतात! आणि लोकांच्या नानाविध विनंत्यांना सूचनांना विनयशीलपणें, समजंसपणे पण तितक्याच ठामपणें तोंड देतात! वास्तविक पाहतां कार्याध्यक्ष म्हणून भरगच्च भरलेल्या सभागृहात हजर राहून, आरामांत गाणं ऐकीत उपस्थित रसिकांसमोर आपली प्रतिमा उजळ करण्याची नामी संधी त्यांनी घेतली असती तर त्यांत कांही वावगं नव्हतं! भल्याभल्यांना न आवरणारा असा हा मोह! पण श्री दिवेकरांच्या बाबतीत ते होणे नाही! ही अनमोल संधी ते अगदीं सहजतेने टाळतात—एखादा राग गातांना त्यांतील वर्ज्य स्वर कटाक्षाने टाळावेत इतक्या सफाईदारपणें, अगदीं सहजतेनें! कारण श्री. दिवेकरांच्या जीवाला ध्यास लागलेला असतो तो सेंटरच्या प्रतिमेच्या आणि प्रतिष्ठेचा! मग कार्यकर्त्यांना असल्या गोष्टींची अपूर्वाई वाटून त्यांच्याविषयींचा आदर वाटल्यास नवल तें काय?

वृत्तीतील सुरेलपणा ही शिकविण्याची बाब नव्हे. तो रक्तांतच असावा लागतो. त्यांत टक्केवारी नसते. एकतर तो असतो किंवा अजिबात नसतो. श्री. दिवेकरांच्या रक्तांतील सुरेलपणाला घरंदाज अभिनयाची जोड मिळालेली! त्यामुळें कुठल्याही परिस्थितीत वांट्याला आलेल्या "भूमिके"चं बेअरिंग ते "सूर" सांपडल्यासारखं सांभाळतात! त्यांच्या वागण्या, बोलण्या, चालण्यांत मूर्तीमंत घरंदाजपणा असतो. त्यामुळेंच कुठल्याही संस्थेतील त्यांची कार्याची मैफल मस्तपैकी जुळून जाते!

तर असे हे वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी संगीत व अभिनय ह्यांची "सूरां मी वंदिले" अशा निष्ठेने आराधना करणारे "नाट्यगाननिपुण" सॉलिसिटर श्री गणपतराव दिवेकर—एक घरंदाज सुविद्य रसिक आणि सद्‌गृहस्थ!

अभिष्टचिंतन

सॉलिसिटर श्री गणपतराव दिवेकरांच्या व्यक्तिमत्वाची बंदीश अनेक बाजूंनी बनलेली

असल्यामुळें तिचा कितीही विस्तार केला तरी तो कमीच होईल! म्हणूनच त्यांच्या ख्याल "ओळखी"चे हे छोटेसे नोटेशन!

त्यांच्या भावी जीवनांत

"तुम्हां तो शंकर सुखकर हो"

आणि

"दुःखाचे व्हावे पळ, सुख घटका व्हावे

स्वर सातही यावे, गुंजत गात जुळून—"

असाच सुरेल अनुभव येऊन

"जीवेत् शरदः शतम्"

होण्याचं भाग्य त्यांना लाभावं

हीच आजच्या "शुभ दिन शुभ घडि—"

त्यांच्यासाठी

"प्रभूपदास नमित"

विनम्र, सश्रद्ध प्रार्थना!

— ० —

गणपतराव–एक प्रसन्न व्यक्तिमत्व

(लेखक : ॲड. वि. म. बापट)

कांही व्यक्तींना पाहिल्याबरोबर मन प्रसन्न होते, आपल्यामधे विश्वास निर्माण होतो, त्यांच्या चेहेऱ्यावरच सौजन्य व सदाचार प्रतिबिंबित झालेला दिसतो, अशा फारच थोड्या व्यक्तींपैकीं माझे मित्र श्री. गणपतराव दिवेकर हे गृहस्थ.

श्री. गणपतराव व मी १९३१ पासून कॉलेजमधील सहाध्यायी. कॉलेजशिक्षणानंतर आम्ही दोघानीही समान व्यवसाय निवडले. ते झाले सॉलिसिटर तर मी वकील. व्यवसाया-निमित्त आम्ही दोघे गेल्या ४०–५० वर्षांत बऱ्याच वेळा एकत्र आलो. माझा प्रदीर्घ अनुभव असा कीं विद्यार्थीदशेपासून असलेली त्यांच्या स्वभावातील ऋजुता, सात्त्विक भाव, प्रामाणिकपणा, जी मला गावली होती, त्यात आजपर्यंत काडीमात्र फरक पडलेला नाही. आजच्या त्यांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेत ते गुण जास्तच शोभून दिसतात.

व्यावसायिक आचारसंहितेबाबत त्यांचे माझे एकच मत. व्यवसायामधे सल्ला देण्यात अगर केस हाताळण्यात त्यांनी कधीही अपव्यवहार केला नाही. तत्त्वनिष्ठा एवढी जाज्वल्य कीं कांहीं दिवस ते भारतीय शासनाचे सॉलिसिटर म्हणून काम करत असतानां स्वतःच्या प्रामाणिक तत्त्वांनां मुरड घालावी लागेल असे व्यवहार शासनाचे आदेशामुळे करावे लागतील, असे दिसताच त्या पदाचा राजिनामा देऊन ते बाहेर पडले. "सत्य-असत्याची मन देते ग्वाही, नाही मानियले बहुमता" ही तुकोबाची शिकवण ते विसरले नाहीत.

संगीताची आवड व नाटकात काम करण्याची हौस, हा एक त्यांचा आगळा पैलू. कॉलेज जीवनात नाटकात स्त्रीपार्ट केला, मुंबई ब्राह्मणसभेच्या संस्कृत मृच्छकटिकात चारुदत्ताची संगीत भूमिका चांगल्याप्रकारे केली. समाजसेवेची आवड असल्याने अनेक संस्थांत जबाबदारीची कामे केली. पडघवली या त्यांच्या मूळगांवातील वार्षिक उत्सवात ते न चुकता हजर राहतात.

व्यवसायांत उच्च प्रतीचे यश, पक्षकारांत विश्वास उत्पन्न होईल, असे कर्तृत्व व आचरण–असे विविध गुण अंगी असूनही अत्यंत निरहंकारी माणूस उच्चनीच भेद न मानता सर्वांना सारखीच अथांग माणुसकीची वागवणूक; असा माणूस सर्वांना प्रिय न झाला तरच नवल !!

आता ते निवृत्तिच्या मार्गावर आहेत, असे कळते. "गृहिणी सचिवः सखी मिथः" अशी साध्वी पत्नी, दोन कर्तबगार पुत्र, एक विवाहित कन्या व चांगली नातवंडे, व पुरेसा धनसंचय, अशा मधुगंधाने डवरलेल्या संसाराच्या पारिजातकाच्या शीतल छायेत ते यापुढे निवृत्तजीवन, शांतपणे जगणार आहेत. जीवन कृतार्थ आहे व लोकसंग्रह पण मोठा आहे. या प्रसंगी 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः " ह्या ईशावास्योपनिषदातील वचनातील उत्तुंग आशावाद त्यांच्या पुढील सुखसमाधानाच्या जीवनात जीवनसाथी व्हावा, एवढीच नम्र प्रार्थना.



श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री

संतकवी श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री

(ले. : ग. मा. दिवेकर)

महाराष्ट्रातील श्रेष्ठ संत कवींच्या उज्वल मालिकेंत श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री यांचे निश्चित स्थान आहे. त्यांचे संपूर्ण नांव श्री. दत्तात्रय रामचंद्र कुळकर्णी (यापुढें त्यांचा नामनिर्देश श्रीपंत असाच केला आहे). बेळगांवपासून सुमारे आठ मैलांवर बेळगांव कलादगी रस्त्यावर बाळेकुंद्री-बुद्रुक नांवाचे एक लहानसे गांव आहे. त्यागांवी ३ सप्टेंबर १८५५ (म्हणजे सोमवार, श्रावण वद्य अष्टमी शके १७७७) रोजी श्रीपंतांचा जन्म झाला. त्या गांवचे कुळकर्णीपद श्रीपंतांच्या घराण्यांत पूर्वापार चालू होतें. श्रीपंतांचे वडील श्री. रामचंद्र तथा रामप्पा व मातोश्री सौ. सीताबाई यांना एकंदर ११ अपत्ये झाली. त्यांत श्रीपंत सर्वांत मोठे. त्यांना पांच भाऊ व पांच भगिनी. बालपणाची पहिली सात-आठ वर्षे बाळेकुंद्री येथें घालवून श्रीपंतांना सन १८६४ मधें त्यांच्या मामांकडे दड्डी या गांवीं शिक्षणाकरितां पाठविण्यांत आले. हा भाग कानडी भाषेचा असल्यामुळें त्यांचे प्राथमिक शिक्षण कानडीतूनच झालें. पण घरांतील भाषा मराठी होती. त्यामुळें श्रीपतांचा मराठीं भाषेचाही अभ्यास चालू होता. प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर १८७२ साली श्रीपंत बेळगांवला पुढील शिक्षणासाठी गेलें. सन १८७७ मधें ते त्यावेळी प्रचलित असलेल्या पब्लिक सर्व्हिसच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. सन १८८० मधें मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. सन १८८२ मधें त्यांचा विवाह झाला. त्यांना एक अपत्य झालें पण तो मुलगा अल्पवयी असतानांच निवर्तला. श्रीपंतांची आर्थिक स्थिती अगदी सामान्य होती व स्वतःचे शिक्षण त्यांनी शिकवण्या करूनच पार पाडलें. शिवाय त्यांच्या धाकट्या पांच बंधूंच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांचेवरच होती. श्रीपंतांचे वडील सन १८८६ मधें कालाधीन झाले. सन १९०३ मधें श्रीपंतांनीं लंडन मिशन शाळेंतील शिक्षकपदाचा राजीनामा दिला. ता. १६–१०–१९०५ रोजीं वयाचे ५० व्या वर्षी त्यांचे बेळगांवी निधन झालें. सुमारे २२ वर्षे त्यांनी शिक्षकाची भूमिका बजाविली. थोडक्यांत श्रीपंत हे बाह्यतः गृहस्थाश्रमी होते व त्यांचा स्वतःचा जरी संसार मोठा नव्हता तरी त्यांच्या सर्व कुटुंबाच्या मोठ्या संसाराचा भार त्यांच्यावरच पडला होता.

श्रीपंतांचे शालेय शिक्षण जरी मॅट्रिकपर्यंतच झालें होतें तरी विद्यार्थीदशेंत श्रीपंतांचे महाभारत, रामायण व इतर पौराणिक ग्रंथांचे वाचन बरेंच झालें होतें. त्यांचें संस्कृत भाषेवर प्रभुत्व असल्यानें वेद, उपनिषदें वगैरे अध्यात्मिक ग्रंथांचाही त्यांचा व्यसंग दांडगा होता. लहानपणीं गुरुचरित्र, दत्तमहात्म्य वगैरे भक्तिपर ग्रंथ वाचून ते श्रीदत्त या दैवताचे उपासक झाले होते. इत्यादि गोष्टीमुळें श्रीपंतांची मनोभूमिका विद्यार्थीदशेंतच आध्यामिक बनत चाललेली होती. अर्थात् सुकाणूचा अभाव असल्यामुळें मनाची ओढाताण चालूच होती. पण अशाच मानसिक स्थितींत असतांना सन १८७५ मधें म्हणजे वयाच्या विसाव्या

वर्षी श्रीपंतांची बाळप्पा अथवा बालावधूत नांवाच्या एका फकिरीवृत्तीच्या सत्पुरुषाची गांठ पडली आणि त्यांचे सारे जीवनस्वरूपच बदलून गेलें. त्यांनी स्वतःच एका पद्यांत वर्णन केलें आहे. "शके सत्राशे सत्त्याण्णव युवनाम संवत्सरी । आश्विन मास असितपक्ष द्वादशी शुभवासरी । बालावधूत तरणी उदेला परमव्योमकुंदरी । दर्शनमात्रें समूळ सरली अज्ञान-शर्वरी" तेव्हांपासून श्रीपंतांच्या जीवनाला एक आगळेंच वळण लागलें. श्रीबाळप्पानें श्रीपंतांवर अनुग्रह केला व श्रीपंतांनीं त्यांना सद्‌गुरु मानलें. एथूनच श्रीपंतांच्या गुरुभक्तीचा प्रारंभ झाला तो जीवनाच्या अखेरपर्यंत ! श्रीपंत अवधूत-मार्गी झाले. शरीराने व वर्तनानें संसारांत राहूनही मनानें अगर वृत्तीनें ते संन्यासी झाले.

श्रीबाळप्पांच्या सान्निध्यांत मधून मधून राहून श्रीपंतांनीं योगविद्या हस्तगत केली व भजनाचीही त्यांना आवड लागली. श्रीबाळप्पानीं श्रीपंतांचा आध्यात्मिक अधिकार ओळखून श्रीअवधूत सांप्रदायातील आपले वारसदार म्हणून त्यांना मानले व श्रीपंतांच्याच शब्दांत सांगावयाचे तर श्रीबाळप्पानीं "वेणुनगरी ब्रह्मज्ञानाचें कोठार । उघडुनी थोर ख्याती केली ! शके १७९९ चे कार्तिक महिन्याचे सुमारास श्रीबाळप्पा एकाएकीं अदृश्य झाले. श्रीबाळप्पा नाहींसें झाल्यानंतर श्रीपंतांनीं त्यांच्या गुरुच्या सल्ल्याप्रमाणे प्रपंचातच राहण्याचे ठरविले. तरीपण सद्‌गुरुभक्ति, ज्ञान व वैराग्य यांनींच त्यांचे पुढील जीवन व्यापून टाकिले. त्यांच्या जीवनाचा हा धावता आढावा आहे. जास्त तपशील कै. केशव रामचंद्र दिवेकर यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेल्या श्रीपंत चरित्र ग्रंथांत वाचायला मिळतो. या ठिकाणी श्रीपंतांची एक संतकवी म्हणूनच ओळख करून द्यावयाची असल्यानें इतर तपशीलांत जाण्याचें प्रयोजन नाहीं.

श्रीपंतांचे वाङ्मय गद्य व पद्य या दोन्ही स्वरूपांत उपलब्ध आहे. सन १८८३ सालापासून श्रीपंतांनीं अध्यात्मिक लेख लिहावयाला सुरवात केली व अखेरपर्यंत त्यांनी अनेक लहान मोठे लेख अगर निबंध लिहिले. तसेच गुरुबंधूना उपदेशपर अगर आध्यात्मिकस्वरूपाची अनेक पत्रें लिहिली. हे सर्व गद्य साहित्य पंतवाङ्मय पुष्पें २ ते ८ या पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें आहे.

श्रीबाळप्पांचा विरह झाल्यापासून श्रीपंत आपलें मन भजनांत रमवूं लागले. सुरवातीला ते श्रीबाळप्पांची व इतर भजनें म्हणत असत. पण जसजसा त्यांचा स्वानुभव वृद्धिंगत होत चालला, गुरुभक्ति तीव्र होत चालली, तसतशी त्यांच्या हृदयात नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा निर्माण होऊं लागली व ती काव्यरूपाने बाहेर येऊं लागली. श्रीपंतांच्याच शब्दांत सांगावयाचें तर "स्वयंभू पाण्याचे झरे ज्याप्रमाणें जमीन फोडून वर येतात अथवा कारंज्याच्या पाण्याचे फवारे जसे सहज वर उडतात त्याप्रमाणे निघालेले या पदांतील उद्गार आहेत. ते सहज प्रेमोद्गार आहेत." श्रीपंत भजन करावयाला बसले कीं त्यांच्या मुखावाटे सहजपणें गीतबद्ध पदें बाहेर पडूं लागली कीं, ती त्यांचे शिष्य लिहून घेत असत. अशा तऱ्हेनें सुमारें १८८० सालापासून तो शेवटपर्यंत श्रीपंतांनीं अनेक पदें निर्मिली व ती

पुढें 'दत्तप्रेमलहरी पुष्प १' या पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्यांत आली. श्रीपंतांची ही पदें म्हणजे 'आनंद प्रेम लहरी आहेत.' "सद्गुरु अंतरी प्रगट होतां । उठते प्रेम लहरी" असें त्यांनींच एका पदांत म्हटलें आहे. म्हणून या पुस्तकाचें नांवही 'श्रीदत्त प्रेम लहरी' असें सार्थ ठेविलें आहे. काव्याची खरी ओळख व त्याचे रसग्रहण हें प्रत्यक्ष काव्य वाचूनच होऊं शकते. त्याचें नुसतें वर्णन अगर परीक्षण करून होणार नाहीं. तेव्हां श्रीपंतांच्या काव्याची खरी ओळख 'श्रीदत्तप्रेमलहरी वाचूनच होईल. पण त्याची झलक म्हणून कांहीं पदें प्रत्यक्ष उधृत करून त्यांच्या काव्याचा परिचय करून देण्याचा प्रयत्न इथें केला आहे.

श्रीपंतांच्या काव्याचें एक वैशिष्ट्य असें कीं त्यांच्या जवळजवळ सर्व कविता या 'पद' रुपांत आहेत. साक्या, दिंड्या, आर्या किंवा वृत्तनिष्ठ रचना त्यांच्या काव्यांत नाहींत. आणि त्यापदांतून संगीतही आहे. श्रीपंतांचे साधारणतः प्रत्येक पद भजनी पद्धतीनें अगर संगीत पद्धतीनें म्हणणें शक्य आहे. काहीं पदें तर त्यांनीं मराठी नाट्य–संगीताच्या चालीवर 'रचिली आहेत असें दिसतें, कै. अण्णासाहेब किर्लोस्करांची 'शाकुंतल' व सौभद्र हीं नाटकें रंगभूमीवर १८८० नंतर आली होती. त्यांतील पदांच्या चालींचा त्यांच्या मनावर पगडा पडला असावा. उदाहरणार्थ, सौभद्रातील श्रीकृष्णाचें 'तस्कराहातीं । द्विजगोधन हरिलें । तया पार्थासि शरण आणिलें' या पदाच्या चालीबरहुकूम श्रीपंतांचें एक पद आहे ते पहा.

देखिले पाय । पाय सद्गुरुचे । सार्थक झाले जन्माचे ॥ धृ० ॥
जिवाची भ्रांति । भ्रांति समुळ गेली । भवाची भीति सहज सरली ॥ १ ॥
सोहं हा बोध । बोध मनी ठसला । संशय अंतरीचा गेला ॥ २ ॥
अविद्याबंध । बंध वाव झाला । मोक्षभावही निमाला ॥ ३ ॥
निमाले भान । भान त्रिपुटीचें । उठले ठाणे द्वैताचे ॥ ४ ॥
सद्गुरुनाथ । नाथ अवधूत । भावाभावातीत दत्त ॥ ५ ॥

तसेंच 'अरसिक किति हा शेला' या सुभद्रेच्या गीताच्या चालीवर श्रीपंतांनी खालील आरतीवजा पद रचिलेले दिसते.

पंचारति ओवाळूं । नित्य सहजानंदे भजनी खेळूं ॥ धृ० ॥
देह हे ताट करूनी । मन बुद्धी शुद्ध निरांजनीं ॥
भक्तीचे घृत घालोनी । ज्ञानज्योति अखंड दीप पाजळूं ॥ १ ॥
जिवशिव माया खोटी । चिद्विलासी भासे सहज त्रिपुटी ॥
मिथ्याही द्वैत रहाटी । सद्गुरु निजबोधे द्वैत हे जाळूं ॥ २ ॥

नाहीं मुळीं अहं ममता । बंध मोक्षाची ही कल्पित वार्ता ॥
खूणही बाणली दत्ता । निजरंगी रंगुनी स्वरुपी मिळूं ॥ ३ ॥

ज्याप्रमाणें 'शाकुंतल', 'सौभद्र' या नाटकांत कानडी चालींचा भरणा पुष्कळ आहे तसाच श्रीपंतांच्या पदांतही कानडी चाली पुष्कळ आहेत.

श्रीपंतांच्या पदांचे मुख्य वैशिष्ठ्य म्हणजे त्यांच्या पदांचा स्थायीभाव 'उज्वल गुरुभक्ति, शुद्ध अद्वैतबोध, उत्कट किंवा पराकोटीचे गुरुप्रेम, कडकडीत वैराग्य, अंतरंगीची असंगता व दिव्यप्रबोधिनी शक्ति' अशा कोटींतले आहे. श्रीपंतांच्या जवळजवळ सर्व पदांचा विषय यापैकी एक अगर दुसरा दिसून येतो. त्यांच्या पदांतून उपदेश असलाच तर तो गुरुभक्तिवाचून अन्य नाहीं, त्यांच्या पदांत प्रेम असलेच तर ते गुरुप्रेमावाचून दुसरे नाही, त्यांच्या पदांतून तत्वज्ञान असलेच तर ते अद्वैत सिद्धांतावाचून दुसरे नाही, त्यांच्या पदांतून स्वानुभव असलाच तर तों गुरुभक्तिवाचून दुसरा नाही. त्यांचा धर्म गुरुसेवा, त्यांचा ईश्वर सद्‌गुरु व त्यांचे आराध्य दैवतही सद्‌गुरुच, थोडक्यांत त्यांच्या साऱ्या पदांचे सार काढावयाचे म्हटलें तर 'सद्‌गुरुच परमेश्वर, सद्‌गुरुपायीच दृढभक्ति-प्रेम, सद्‌गुरु-पदीच जगणे, सद्‌गुरुपदींच सर्वस्व अर्पण, सद्‌गुरुच प्रेमळ माय, सद्‌गुरुसेवाच स्वधर्म, सद्‌गुरुस्वरुपींच समरस होणे' या शब्दांत करावे लागेल.

सर्व जगाचा रक्षक-भक्षक, तारक-मारक परमेश्वर असे आपण समजतो, श्रीपंतांनीं सद्‌गुरु हाच परमेश्वर व परमेश्वराची लक्षणे सद्‌गुरुच्या ठिकाणी असतात असे समजून ते म्हणतात,

सर्व रक्षक सर्व भक्षक । सद्‌गुरु दत्त माझा ॥ धृ० ॥
सर्व करुनी सदा अलिप्त । धन्य गुरुराया ॥ १ ॥
महादयाळु अति निष्ठुर । नाहीं भाव दुजा ॥ २ ॥
तारक मारक सद्‌गुरु हाचि । सगुण भक्तकाजा ॥ ३ ॥
द्वैताद्वैत तोचि नटतो । पहा दत्तमौजा ॥ ४ ॥

त्यांच्या दृष्टीनें, सर्वशक्तीमंत सद्‌गुरु । सर्व त्याची लीला ॥ धृ० ॥

सर्वरूप हें निजसुखास्तव । भोग्य भोक्ता जाहला ॥ १ ॥
अद्वैतासी न विकरुनी । द्वैतरुप भासला ॥ २ ॥
प्रेमास्तव दत्तावधूत । गुरुशिष्य जाहला ॥ ३ ॥

" मूकं करोति वाचालं । पंगुंलंघयते गिरिम् । यत्कृपातमहं वंदे । परमानंदम् माधवम् " असें श्रीगीता माहात्म्यस्तोत्रांत म्हटले आहे. श्रीपंताच्या दृष्टीने सद्गुरुमहिमा त्याच कोटींतला आहे. म्हणून ते म्हणतात,

आता बोलूं काय गुरुचा महिमाही । ब्रह्म सर्वाठायीं ॥ धृ० ॥

आहे तें नाही जाहले । नाहीं तेंची प्रगटलें । आंधळयानें देखिलें । बहिऱ्यानें ऐकिलें । पांगूळ पळाला । डावचि साधिला । अंधारीं अवघडला । सूर्य भ्रांतीत पडला । सुधा मरण आलें । त्यासी विषचि पाजिले । सूर्यासी थंडी झाली । अग्नीतत्व भिजले । चंद्रासी ज्वर आला । सूर्याघरी धाडिला । षंढा पुत्र झाला । वंध्ये आनंद झाला । शून्य अंकुरा फुटले गुरुभक्त हे झाले । तेजतमी पडला । परब्रह्म जीव जाहला । शब्दाची लीला ही । मुळीं पाहतांच नाहीं । दत्तगुरु खेळे । नित्य प्रेमानंदी डोले ॥ १ ॥

गुरुभक्तिविषयीं तर त्यांची शेकडों पदें आहेत.

गुरुसी शरण जाता । मिळाली निजशांती ॥ धृ ॥
बोधामृत प्राशन करितां । गेली भवभ्रांती ॥ १ ॥
जन्ममरण भीति आटली । कळता निजस्थिती ॥ २ ॥
दत्तचरणीं निश्चित जाहलो । सदा भजनप्रीती ॥ ३ ॥

सद्गुरुची सेवा करीतांना कशाची लाज भीति बाळगण्याचें कारण नाही म्हणून ते म्हणतात.

निंदा करो जन स्तुति करो माझी । रतलों गुरुभजनीं ॥ धृ ॥
ज्ञानी म्हणो अती मूढ म्हणोवा । नाहीं लाज मनीं ॥ १ ॥
नाहीं चाड मज धनमानाची । नाहीं वृद्धि हानीं ॥ २ ॥
न दिसे दृष्टी अन्य कांहीं । दत्त भरला ध्यानीं ॥ ३ ॥

थोडक्यांत सद्गुरु म्हणजे सर्वस्व.

गुरु ही संपत्ति । गुरु ही विपत्ति । गुरुविणें गति नाहीं मज ॥ धृ ॥
गुरु हेंचि धन । गुरुचि वतन । गुरु तन मन ब्रह्मानंद ॥ १ ॥
गुरु बंधु इष्ट । मातापिता तोचि । परब्रह्माची सगुण रुपें ॥ २ ॥
गुरु चि सच्छिष्य गुरुचि सद्गुरु । दत्तपरात्परगुरु हाची ॥ ३ ॥

सद्‌गुरुशी आपले निरनिराळे नातें जोडण्याच्या त्यांनीं अनेक पदांतून प्रयत्न केला आहे

सद्‌गुरुद्वारीचे श्वान आम्हीं । भुंकतो गुरुनाम अखंड ॥ धृ ॥
मायावस्त्र टाकुनी आम्हीं । झालों दिगंबर ॥ धृ ॥
परब्रह्माचे रहिवासी । सद्‌गुरु किंकर ॥ धृ ॥
आम्हीं भिकारी भिकारी । राहिलो सद्‌गुरुद्वारी ॥ धृ ॥
आम्हीं गोसावी गोसावी । आमुची स्थिती परिसावी ॥ धृ ॥
आम्हीं बैरागी बैरागी । परब्रह्मपर भोगी ॥ धृ ॥
विश्वदेऊळ सद्‌गुरुदेव । झालो मी पुजारी ॥ धृ ॥
गुरुपदकमली जाहलो भृंग । नाहीं आम्हीं संसृति संग ॥ धृ ॥
मी गुलाम मी गुलाम मी गुलाम । तूं सद्‌गुरुस्वामी माझा ॥ धृ ॥

अशा तऱ्हेची धृपदें असलेली अनेक पदें त्यांनी रचिली आहेत. श्रीपतांचे सारे जीवन गृहस्थाश्रमांत गेले. पण गृहस्थ कसा तर तेच म्हणतात.

गृहस्थ मज केलें । सद्‌गुरुनें गृहस्थ मज केलें ॥ धृ ॥
शांतिगृहिणी देऊनी मजला ! तूर्यापर नेले ॥ १ ॥
संसार भजन लावुनी पाठीं । निजसुख दिधलें ॥ २ ॥
ब्रह्मानंदे डुलतो दत्त । सहजावधूत खेळे ॥ ३ ॥

बाह्यदर्शनी ते गृहस्थ असले तरी मनानें अगर वृत्तीनें ते संन्यासीच होते. संसारात राहूनही संन्यासी वृत्तीनें मनुष्य राहूं शकतो हे त्यांनीं दाखवून दिलें. ही त्यांची मनोवृत्ती त्यांनीं अनेक पदांतून वर्णिली आहे.

मी तो सन्यासी सन्यासी । दत्त चरणवासी ॥ धृ ॥
संकलपाचे केस टाकुनी । झालों निराशी ॥ १ ॥
द्वैत जाळुनी राख लाविली । सिद्ध कफनी अविनाशी ॥ २ ॥
बोध दंड हाती धरूनी । डुलतो प्रेमरसी ॥ ३ ॥

किंवा

सद्‌गुरुनें दिधली मला फकिरी ॥ धृ ॥
निःसंग कफनी निर्गुणसैली । ऐक्य सोटा कटीं ॥ १ ॥
प्रेमलोटा शमदम लंगोटा । स्वानंद जटाशिरीं ॥ २ ॥
आत्मदीक्षा प्रेमभिक्षा । दत्त सबाह्यांतरी ॥ ३ ॥

थोडक्यांत 'काम्यां कर्मणा न्यासं संन्यासं' अशी गीतेंत संन्यासाची व्याख्या केली आहे त्याबरहुकुम श्रीपंतांचा संन्यास होता.

श्रीपंत दत्तपंथी अगर अवधूतमार्गी होते. या मार्गाचीं अगर सांप्रदायाची परंपरा फार प्राचीन असून ती अनादि व श्रुतिसंमत आहे असें त्यांनी अनेक पदांतून म्हटलें आहे. ते म्हणतात 'संप्रदाय सद्‌गुरुचा । बहु परंपरेचा' सिंहारूढ जरी जाहला । मान राखी मातेचा "पूर्ण बोधापरी कृतघ्न नोहे । अंकित सद्‌गुरुचा । जीवन्मुक्त होऊनी भजन । सहजानंद प्रेमाचा"

लोप पावत चाललेल्या अवधूत मार्गाचा पुनरुद्धार कसा झाला हे सांगतांना श्रीपंत म्हणतात.

कलियुगीं अवधूतमार्ग लोपला । म्हणुनी दत्तप्रभु प्रगटला ॥ धृ ॥
शंकरमथित वेदांतमार्ग । नास्तिकें अवरोधिला ॥ १ ॥
कर्मोपासना योगहि मिथ्या । विषयासी जन भुलला ॥ २ ॥
अधर्म खंडण धर्ममंडळा । दत्तध्वज शोभला ॥ ३ ॥

मग अवधूतमार्ग कसा व कोणी पुन्हां प्रस्थापित केला हे सांगताना श्रीपंत एक पदच रचितात.

उद्भवला पारखपुरीं । प्रगटला जंबू शिखरीं
नित्य खेळे भक्तद्वारीं । तोचि अवधूत गे ॥ १ ॥
शरण जातां भवभय सांडीं । ज्ञान सुखाची वृत्ति मांडी
द्वैत भाव उभाचि खंडी । तोचि अवधूत गे ॥ २ ॥

अत्रि अनुसूया पोटीं आला । दिगंबर जगीं वर्तला
आपुल्या ठायीं आपण रमला । तोचि अवधूत गे ॥ ३ ॥
श्रीपाद श्रीवल्लभ जाहला । भक्तोद्धारा अघटित लीला
दावुनी भिल्लवडीसी राहिला । तोचि अवधूत गे ॥ ४ ॥
नृहसिंह सरस्वती गाणगभुवनीं । चरणस्पर्शें पावन अवनी
लीला मात्रे ने चिद्धवनीं । तोचि अवधूत गे ॥ ५ ॥
वाचा सुटली बोलूं काय । मन मुरले कल्पूं काय
दत्ताविणें नाही ठाय । तोचि अवधूत गे ॥ ६ ॥

श्रीपंतांनीं या दत्तावतारांचे अनेक पदांतून वर्णन केले आहे. तसेंच अवधूतमार्ग सोपा तर सोपा, कठीण तर कठीण असेंही त्यांनीं म्हटलें आहे. इतकेंच नव्हे तर ते म्हणतात.

अतिगूढ मार्ग हा आमुचा । मथित अनादि अवधूताचा ॥ धृ ॥
सगुण म्हणतां लक्षण नाहीं । निर्गुणासी ठाव तो कैंचा ॥ १ ॥
भक्तिज्ञाना नाही शिवतला । अनन्य भावें कळे साचा ॥ २ ॥
कैवल्यावधूत दत्त । प्रलयांबुधि निजप्रेमाचा ॥ ३ ॥

श्रीपंतांचा उपनिषदांचा अभ्यास व व्यासंग चांगलाच होता हे त्यांच्या पदांवरून सिद्ध होते. गुरुभक्तीबरोबर त्यांचा अद्वैतसिद्धांतावरील विश्वास अनेक पदांतून दिसून येतो. सर्व खलु इद ब्रह्म," "एकमेवाद्वितीयम् ब्रह्म," "नेहनानास्ती किंचन" अशी श्रुतिवचनें त्यांच्या पदांतून वारंवार आली आहेत व त्यावरून त्यांचे ठिकाणीं 'ब्रह्मात्मैक्यनुभव' किती स्थिर झाला होता हे दिसून येते.

भेद समूळ गेला । शुद्ध ज्ञान म्हणावे त्याला ॥ धृ ॥
एकमेव नास्ति द्वितीयं । श्रुति निर्णय झाला ॥ १ ॥
तत्वमसिनें अहंब्रह्मास्मि । अनुभव बाणला ॥ २ ॥
त्रिपुटी गिळुनी ठायीं रमता । दत्तरुपीं भरला ॥ ३ ॥

तसेंच, अद्वैताचें वेड लागले न सुचे मज काही

ब्रह्मानंदी वृत्ति हरपली खेळे प्रेमडोहीं ॥ धृ ॥
फाडुनी द्वैतवस्त्र लेहलें आकाशांबर
भेद जाळुनी अंगी लाविले भस्म मनोहर ॥ १ ॥
ज्ञान विज्ञान पादुका पायीं ऐक्य बोधसोटा
जीवन्मुक्ति सहज भोगिली काढुनी भेद कांटा ॥ २ ॥
अंतर्बाह्य एकार्णव प्रेमें मंदसुगी
दत्तगुरुची कृपा होता रंगलों निजरंगी ॥ ३ ॥

पण अद्वैतवादी असूनही त्यांची श्रद्धा गुरुभक्तीवरच होती. बाकी सर्व तुच्छ आहे असे ते म्हणतात.

कैवल्यासी लाथ मारुनी वरिली गुरुभक्ति।
सद्‌गुरु बोधें समूळ गेली जन्म मरण भीति।

दुसऱ्या एका पदानें ते म्हणतात.

संतांचें धरुनी पाय। चुकवी अपाय। सुलभ उपाय। कवीं तारक। याविणें अन्य साधनें दुःखदायक। नको वेदशास्त्र अध्ययन। शुष्क अभिमान। न पावसी ज्ञान। मोक्ष-दायक। करा भक्ति गुरुची मुक्त होसी निःशंक। प्राणायाम वेदोक्त कर्म। आश्रम धर्म। कष्टकारक। आचरितां कल्पवटी प्राप्त नोहे निजसुख ”

श्रीपंतांचे ज्ञान अनुभव-सिद्ध, निश्चयात्मक व त्रिपुटी रहीत होते. ही वृत्ती त्यांनीं अनेक पदांतून बोलून दाखविली आहे.

“ पूज्य पूजक पूजन सारुनी। दत्तपणा गुरुपदी जडउनी। तन्मय मी जाहलों अखंड–”

ध्याता नाहीं ध्यान कैचें सर्वदा ध्येयचि ते
ज्ञाना ज्ञान ज्ञेय त्रिपुटी। केवळ ज्ञानचि ते
भोक्ता भोग्य भोगस्वरुप। भेद बोल रिते
साक्षी साक्ष्य परब्रह्म। दत्तरुप नटते

श्रीपंतांचा कर्मकांड, देवपूजा, नेमनियम, उपासतापास, चमत्कार यांवर भर नव्हता किंबहुना

व साधनांवर त्यांनीं टीकाच केली आहे. गुरुभक्ति हेच ईश्वरप्राप्तीचे व मुलावस्थेचे साधन आहे अशी त्यांची भावना होती व ती अनेक पदांतून त्यांनीं व्यक्त केली आहे.

सुखकर दत्त भजन । पाही ॥ ध्रु ॥
कशाला हे जपतप साधन । करिसी देवपूजन ॥ १ ॥
स्त्रीपुत्रादिक छळिति म्हणुनो । सेविसी व्यर्थ वीजन ॥ २ ॥
ऋद्धि सिद्धि गारुड दाऊनी । भुलविसी व्यर्थ हे जन ॥ ३ ॥
ज्ञानाभिमानें प्राप्त नोहे कदा । श्रीगुरुकृपाजन ॥ ४ ॥
निशीदिनी दत्तभजन करिसी तरी । पावसी निरंजन ॥ ५ ॥

दुसऱ्या एका पदांत ते सडतोणपे वजावतात.

हसूं नका तुम्ही रुसूं नका । संसार हा शाश्वत नोहे विषयामधें फसूं नका ॥ ध्रु ॥
जपतप साधनें कशास करितां । आहार त्यजुनी कांहो मरतां ।
देव नाहीं सद्गुरुपरता । त्यांचे चरणीं मोक्षनिका ॥ १ ॥
शास्त्र पुराणे वेद पढूनी । वेदांत सिद्धांत वाक्ये पाहुनी
वाद विवादीं अभिमान धरुनी । शब्दब्रह्में फुगू नका ॥ २ ॥
बंध मुद्रा अचुक साधुनी । अति कष्टानें वायु रोधुनी
ब्रह्मरंध्रावरी उठोनी । एक देशी तुम्ही होऊ नका ॥ ३ ॥
पंचविषयीं विराग धरा । काम क्रोध मोह हरा
मनचांचल्य नष्ट करा । संतसंग त्यजूं नका ॥ ४ ॥
तूर्यावस्था उत्तम साधा । खंडा ग्रंथी त्रिपुटी बाधा
कान देउनी बालबोध । उरला नुरला दत्तसखा ॥ ५ ॥

गुरुभक्तीपुढें वेदशास्त्रपठण वगैरे कुचकामाचें आहे, उलट त्यानें अहंकार निर्माण होतो हे त्यांचे वरील पदांतून दिसून येणारे मत त्यांनी अनेक पदांतून मांडले आहे.

श्रीपंतांचा स्वनुभावर जास्त जोर होता व स्वानुभवाला त्यांनीं गुरुभक्ति इतकेंच महत्व दिलें आहे. एका अप्रतिम पदांत त्यांनीं ऐक्यबोधाचा स्वानुभव सिद्धांत सांगून आपल्या शिष्यांना उपदेश केला आहे तो उल्लेखनीय आहे.

आरंभ नाही शेवट कैचा मध्यस्थितीला भुलूं नको ।
संसारामधीं एकही पाऊल अनुभवाविण। टाकूं नको ॥ ध्रु ॥

जन्मा येउनी पंचविषयासाठीं निशिदिनीं झुरूं नको
अज्ञानामधीं दुःख भोगुनी व्यर्थ पशुवत् मरुं नको ॥ १ ॥
गुरुविणे अन्य दैवत नाहीं कल्पित देवा पुजूं नको
सद्गुरु आत्मा तुझा तूंचि बोध मनींचा सोडूं नको ॥ २ ॥
वेदशास्त्रांची भीड धरुनी संशयरानीं फिरुं नको
स्वानुभवसिद्धांत दत्ताचा ध्यानी धरीं विसरूं नको ॥ ३ ॥

श्रीपंतांची मनोवृत्ती मुख्यतः आध्यात्मिक अगर पारमार्थिक होती. सद्गुरु हेंच त्यांचे दैवत व त्या दैवतांचे चरणी आपलें सारें जीवन त्यांनीं वाहून घेतलें होते त्यांची सारी काव्यप्रतिभा सद्गुरुस्वरुपी लीन झाली आहे. त्यांचे सारे काव्य भक्तिरसानेच ओथंबलेले आहे. गुरुभक्तीवाचून इतर कोणालाही वैयक्तिक भाव त्यांचे काव्याने दिसून येत नाही. कोणत्याही स्वकीयाच्या स्तुतिपर अगर स्वतःविषयींच्या सुखदुःखासंबंधी त्यांनी एकही पद केलेलें नाहीं. अर्थात त्यांच्या काव्यांत विषयांच विविधता नाहीं व गुणांचीही विविधता नाही. तरीपण शब्दसौंदर्य, माधुर्य, सढळता वगैरे गूण मधून मधून दिसून येतात. अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा अगर रुपकें वगैरे काव्यप्रकार त्यांचें पदांतून भरपूर आहेत. भाषामात्र केवळ ललित नसून ती जोरकस व कधी कधीं बोजड झाली आहे ते स्वतः संस्कृत पंडीत असल्यानें संस्कृत शब्दांचा उपयोग वारंवार झाला आहे. तसेंच काव्य उत्स्फूर्त असल्यानें व शब्दभांडार मोठे असल्याने मनींच्या कल्पना, भावना, अर्थ वगैरे व्यक्त करतांना शब्दांची कमतरता पडलेली दिसत नाहीं. अनुप्रास व शब्दलालित्य यांचे दोन नमुने पहा.

दत्तराज निजशांतिधाम मम चित्तचकोरासी
सत्यज्ञानांनत सद्गुरु भक्तहृदयवासी ॥ धृ० ॥
कंद जगाचा नंद संसृति चंदिरमदहरणा
नंदविधिहरा छंदस्वरूपीं वृंदारकरमणा ॥ १ ॥
धूतकल्मषावधूतवृत्ति अद्भुतधीर्यधारी
भूतभावनोध्दूत प्रकृति अद्भुत चराचरीं॥ २ ॥
कर्महरा निजशर्मरूप सद्धर्मचरित मोदा
निर्मलांतश्रुतिमर्मविदा दत्तउर्मी ब्रह्मानंदा ॥ ३ ॥

श्री दत्ताचे त्यांनीं वर्णन केले आहे,

अत्रिनंदना सुरवरवंदना । द्वैतकंदना दत्तगुरु ॥ धृ० ॥
नित्य निरंजना भवभयभंजना । भक्तरंजना दत्तगुरु ॥ १ ॥

त्रिगुणातीता त्रिपुटीरहिता । शुद्धाद्वैता दत्तगुरु ॥ २ ॥
निर्विकारा निराकारा । सर्वाकारा दत्तगुरु ॥ ३ ॥
सत्चिदानंदा जगदादिकंदा । प्रेमछंदा दत्तगुरु ॥ ४ ॥
भक्तपाला पूर्ण दयाळा । दत्तप्रेमळा दत्तगुरु ॥ ५ ॥

तसेंच त्यांच्या पदांतून उपमा, रूपक वगैरे अर्थालंकारांचा वारंवार उपयोग केलेला दिसून येतो. रूपकाचे एक उत्तम उदाहरण असलेले 'पंचारति ओवाळूं' हे आरतीवजा पद वर दिलेच आहे. रूपकाचे आणखी एक उदाहरण, संसारजीवीताचे वर्णन करितांना एका पदांत दिसून येते.

माहेरा जाते मी सद्गुरु घरा। नांदे निजशांति तेथे दुःख ना जरा ॥ ध्रृ० ॥
भवारण्य बहुत बिकट। असती उंच चार घाट
अंधकार भरला दाट । काळदूत फिरती धीट
पार जाया न मिळे वाट । न दिसे किनारा ॥ १ ॥
मायानदी भयंकर। नसतो नम्र अहंकार
काम क्रोध जलचर। न दिसे कधीं पैलतीर
वासना घोर । जन्ममरण भोंवरा ॥ २ ॥ वगैरे

विश्वरूपीं दत्ताची आरती करीतांना वापरलेले रूपक पहा.

शुद्ध गगनतारीं चंद्रसूर्य ज्योति। विश्वरूप दत्ता ओवाळूं आरती ॥ ध्रृ० ॥
पुष्पनक्षत्रें उडविली आयिती। मीपण टाकुनी भोगिली शांति ॥ १ ॥
अवनी जलासी अनिलाकाश। पाहतां विलसे शुद्ध सत्तास्फूर्ति ॥ २ ॥
अहं त्वं इदं माया कल्पित । ओवाळली दत्ताऐक्यारति ॥ ३ ॥

उपमालंकाराचीही पुष्कळ उदाहरणें त्यांच्या काव्यांत आहेत. त्यांच्या पदांत सुभाषितें फारशी नाहींत पण वानगीदाखल कांहीं देता येतील.

अमृत सांडुनी तक्रविणे । जळो त्याचा व्यवसाय ॥
माता कोपेतरी पित्याकडे । बाळा नाहीं ठावें अन्य कोणी ॥
पापपुण्याचा होतसे झाडा। घेतां सद्गुरु नाम काढा ॥
प्रेमाची ही पिशी जात। जाणों जाता न लगे अंत ॥
प्रेमाची उजळणी । हीच उत्सवाची कहाणी ॥

बहुतेक मराठी संतकवींचे काव्य ही ओंवी अगर अभंगाच्या रूपानें झालेले आहे. श्रीपंतांचे बहुतेक काव्य पदरूपानें झाले आहे. प्रत्येक पदांत धृपद व तीन ते पांच अंतऱ्यांचे चरण आहेत. कांही पदें पुष्कळच लांबलचक आहेत. श्रीपंतांची प्रकाशित पदे अगर काव्यरचना सुमारे २७९५ आहते. त्यापैकी सुमारे २६ पदे कानडीत आहेत, सुमारे सहा पदे हिंदीत आहेत व बाकीची मराठींत आहेत. त्यापैकीं ९८ आरत्या आहेत. १५ अभंग आहेत व सुमारे १० ओव्या आहेत. त्यांचे एक संस्कृत पदही आहे.

ब्रह्मैवाहं किल सद्गुरु कृपया ॥ धृ० ॥
ब्रह्मैवाहं ब्रह्मैवाहं । सत्यज्ञानानंतघनोहं
दृश्यादृश्य भासातीतं । हेतुविहीनं सुगमस्वरुपम्
मायाऽविद्या जीवेश्वरयोः । सर्वाधारं चाधिष्ठानम्
सर्वातीतं सर्वांतर्यो । सच्चित्सुखमयपूर्ण स्वरूपम्
भेदाभेद भाव विवर्णितं । सर्वदृष्टा साक्षिमयोहम्
भावाभावातीत सहजं । बालमुकुंद चरणरजोहम्

श्रीपंतांच्या पदांत श्रीज्ञानेश्वरांचा कल्पनाविलास व शब्दलालित्य, श्रीरामदासांची व्यावहारिक व राजकीक अगर सामाजिक दृष्टी, श्रीतुकारामाचा भोळाभाबडेपणा वगैरे दिसून येत नाहींत. तसेंच समाजांतील नीती, धर्म, सोंगढोंग, उपदेश वगैरे गोष्टींवर त्यांचें काव्यांत फार भर दिलेला दिसत नाही, त्यांचे काव्य थोडफार श्रीएकनाथांच्या काव्याशीं जुळते असूं शकेल. श्रीएकनाथांनीं 'नवल' अगर 'नवलाई' अशाप्रकारचें चमत्कृतिजन्य काव्य केलें आहे तशी श्रीपंतांचीही कांहीं पदें आहेत.

अपूर्व नवल स्वप्नी देखिलें । शिष्यें सद्गुरुसी गिळिले ॥ धृ ॥
अंगना स्त्रिया भोगुं लागल्या । अरुप पुत्रातें व्याल्या ॥ १ ॥
गोडीनें समूळ साखर खादली । रुचीनें जिव्हाचि गिळिली ॥ २ ॥
गंधे सुमनासीं भक्षिलें । अजन्मे अलक्ष लक्षिलें ॥ ३ ॥
मुक्यानें जयजयकार केला । श्रवणें बधिर डोलूं लागला ॥ ४ ॥
अवधूतकृपें जागृति झाली । दत्तभजनीं निद्रा लागली ॥ ५ ॥

तसेंच,

आज मी एक नवल देखिलें । वाघशेळी एकें ठायीं आले ॥ धृ ॥
ब्राह्मण सर्व म्लेंछ जाहले । वेदबाह्य ब्रह्म दिसले ॥ १ ॥
सूर्याच्या गांवी गडद पडलें । अंधारी सर्वचि दिसले ॥ २ ॥
दत्तस्वरुपी सर्वचि निमले । भजन करितां सर्व उदेले ॥ ३ ॥

श्रीएकनाथांनी कुंटीणीची, कोल्हाटीणीची, सौरीची वगैरे भूमिका घेऊन अभंगरचना केली आहे. तशाच प्रकारचे श्रीपंतांच्या काव्यांतील कांहीं मासले पाहाण्यासारखे आहेत.

बटीक मी आजी झालें । सद्‌गुरु घरची ॥ धृ ॥
मायबाप बंधु बहिणी । सोडियली प्रीतीची ॥ १ ॥
भयशंका लाज गेली । भीड नसे जनांची ॥ २ ॥
आयुष्य सदनीं गेलें । कृपाही दत्ताची ॥ ३ ॥

यापेक्षांही जास्त नवलाईचें पद पहा.

सासर माहेर टाकुनी मी परपुरुषीं रतलें
टाकुनी लाज निजगुज सहज भोगूं लागलें ॥ धृ ॥

अहंवस्त्र टाकुनी मी नागवी झाले । तूं पण वस्त्र टाकिता सद्‌गुरुस्वरूपी समरसलें ॥ १ ॥
नाहीं भेद सदा अभेद निजरंगीं रंगले । सरिता सागर एकरूप संगमीं जाहले ॥ २ ॥
होता निःसंग उडला रंग स्वरूप देखियले । अनंत कोटी शशि सूर्यासी दत्तरुप नाकळे ॥ ३ ॥

श्रीपंतांनीं सद्‌गुरुशी अगदीं सलगीकरून अनेक पदें रचिली आहेत त्याचे एक सुंदर उदाहरण पहा.

मी बाळ तूं जननी । सद्‌गुरु ॥ धृ ॥
कुरवाळुनी घेई गे पदरीं । लावी प्रेमस्तनीं ॥ १ ॥
सर्वाधार तूंचि गे माते । आन न त्रिभुवनी ॥ २ ॥
बहुत भागलो नीजी निजवी । दत्त निरंजनीं ॥ ३ ॥

तसेंच "गुरुसवें धरिली आजी कुस्तीरे । प्रेमाची चढली मस्तीरे"
"किंवा "चढली प्रेमाची मस्ती । केली गुरुचरणीं वस्ती"

अशा तऱ्हेची दांडगाईची सलगीही त्यांनीं केली आहे. "दर्शनासी कां गा लाविला उशीर । धरवेना धीर आतां कांहीं अशा करुणात्मक काव्यपंक्तीही त्यांनी रचिल्या आहेत. एक ना दोन, केवळ सद्‌गुरुविषयीं श्रद्धा, भक्ति, प्रेम, अध्यात्म, अनन्यभाव श्रीपंतांच्या पदांतून इतके ओतप्रोत भरले आहेत कीं त्याला मराठी वाङ्मयांत दुसरी तोड नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

वरील विवेचनावरून श्रीपंतांच्या काव्याची निदान तोंड ओळख तरी होईल असें

वाटतें. इतकी मोटी काव्यरचना असूनही श्रीपंतांची महाराष्ट्र जनतेला असावी तितकी ओळख दिसत नाहीं. विशेषतः मराठी साहित्य क्षेत्रांत त्याला कांहीच मान्यता दिसत नाहीं. याचें एक कारण असें असूं शकेल कीं श्रीपंतांचें सारें जीवन कानडी मुलुखांत गेलें. शिवाय त्यांचा काव्यग्रंथ प्रथमतः सन १९१७ मध्यें म्हणजे त्यांचे मृत्यूनंतर सुमारे बारा वर्षांनीं प्रसिद्ध झाला व त्यांचे जीवन–चरित्र सन १९३७ मध्यें लिहून प्रसिद्ध झालें. त्यांच्या शिष्यपरिवाराची संख्याही मर्यादित दिसते. स्वतः श्रीपंतांची व त्यांच्या शिष्यवर्गाची प्रसिद्धी पराङमुखता हेंही एक कारण असूं शकेल.

श्रीपंत स्वतःच म्हणतात.

लौकिकाची चाड टाकुनी धरिला गुरुपंथ ॥ धृ ॥
अहंममत्व सांडिता नित्य झालो मी शांत ॥ १ ॥
विषयी जनाचा वीटचि आला आवडती संत ॥ २ ॥
सद्‌गुरुबोधें स्वरूप जाणुनी जाहलों देहातीत ॥ ३ ॥

श्रीपंतांचे सारे काव्य गुरुभक्तिपर असल्यानें ते एक देशी झाले आहे हेंही एक कारण असूं शकेल. विसाव्या शतकाच्या सुरवातीनंतर भक्तिकाव्य मागें पडून भावगीताचा प्रभाव वाढत चालला. पण कांहीं असले तरी एक गोष्ट निश्चित कीं श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री यांना महाराष्ट्र शारदेच्या दरबारांत एक मानाचें स्थान निश्चित दिले पाहिजे.

— • —

जीवनपट

(जुलै १९.१३ ते जुलै १९८८)

नांव : ग. मा. दिवेकर तथा जी. एम्. दिवेकर ऊर्फ दादासाहेब दिवेकर

जन्म : २१ जुलै सन १९१३ मध्यें मु. पडघवली, ता. सुधागड, जि. रायगड

प्रा. शिक्षण : इयत्ता ४ थी पर्यंत गांवीं झालें. पुढील शिक्षणासाठीं मुंबई येथें चुलत्याकडे.

उच्चशिक्षण : मॅट्रिक : १९३०; बी. ए. १९३५; एल्. एल्. बी. १९३७
सॉलिसिटर १९४०
अभ्यासाची व वाचनाची आवड.
सॉलिसिटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर चुलते दिवेकर सॉलिसिटर यांचेकडे काम करू लागले.
नंतर प्रेमविवाह झाला. (१९४०)

व्यवसाय : पहिली कांहीं वर्षें आर्थिक दृष्ट्या कठीण गेलीं. म्हणून चार वर्षें मध्यवर्ति सरकारच्यावतीने मुंबई वरिष्ठ न्यायालयांत काम केलें. पुष्कळ अनुभव मिळाला. पण नोकरीला लागणारी मानसिक भूमिका नसल्याने पुन्हा सॉलिसिटरचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला.

दोन वर्षें हायकोर्टात महाराष्ट्र सरकारचा एक सॉलिसिटर म्हणून व सुमारे सहा वर्षें सिटी सिव्हिल कोर्टात मध्यवर्ति सरकारचा वकील म्हणून काम केले. कै. एस. व्ही. गुप्ते ह्या ख्यातनाम वकिल मित्राच्या सहवासांत त्यांनी १९४७ मध्यें प्रसिद्ध केलेल्या हिंदू कायद्यावरील ग्रंथाचे संपूर्ण पुनर्लेखन व नूतनीकरण करून स्वतंत्र ग्रंथ लिहिला.

छंद : नाटक, संगीत, खेळ, साहित्य या विषयांची आवड. अनेक नाटकांत स्त्रीपुरुष भूमिका केल्या आहेत. शास्त्रिय संगीताचा थोडासा अभ्यास केला आहे. टेबल टेनिस ह्या खेळाची आवड. काव्य लेखनही केले आहे. जीवनात कलानंदाचा आस्वाद नेहमी घेतला.

सार्वजनिक काम : अनेक सार्वजनिक संस्थाना विनामुल्य मार्गदर्शन. लायन्सक्लबच्या साह्याने आपल्या गावीं लोकोपयोगी काम भरपूर केले. माटुंगा जिमखाना ही क्रीडा संस्था व दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र ह्या जिव्हाळ्याच्या संस्था. मुंबई मराठी साहित्य संघ, ब्राह्मणसभा इत्यादि संस्थांची कामें.

: आमची प्रकाशने :

१) **वा. रा. ढवळे व्यक्ती आणि कार्य**–संपादक : गुं. फ. आजगांवकर पृष्ठे १४० किं. ३० रु.

२) **नटवर्य माधवराव वालावलकर** : किं. २५ रु. पृष्ठे १६०

३) **क्रांतीपराग** : (काव्यसंग्रह) प्रस्तावना सदानंद रेगे किं. १० रु.

४) **प्राचीन मराठी संतकवी** : भाग २, ३ महाराष्ट्र भाषा भूषण ज. र. आजगांवकर पृष्ठे १००० किं. ६०

५) **भारतातील शास्त्रांचा उद्गम व विकास** : पृष्ठे ३२०

६) **सेनापती भोसले** : किं. १० रु. गुं. फ. आजगांवकर

७) **आजगांव दर्शन** : किं. १० रु. गुं. फ. आजगांवकर

८) **वालावल दर्शन** : किं. १० रु. गु. फ. आजगांवकर

९) **संरक्षण शास्त्र आणि तंत्र** : कॅ. मा. कृ. शिंदे ३० रु.

१०) **कुडाळ देशकर** : खंड १ ते ३ किं. ५० रु.

११) **जीवन ह्याला नाव** : किं. १० रु.

१२) **प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी** : किं. २० रु.

१३) **नटवर्य परशुराम सामंत** : किं. ३० रु.

१४) **स्वरभूषण वसंत देसाई** : गुं. फ. आजगांवकर किं. २ रु.

१५) **माझी वाटचाल** (आत्मचरित्र) : डॉ. नाईक १५ रु.

१६) **गुं. फ. आजगांवकर** (चरित्र) : किं. १० रु.

१७) **स्वानंद लहरी** : ले. स्वामी चिदानंद संपादन–गुं. फ. आजगांवकर

१८) **अनंत शिवाजी देसाई टोपीवाले** : किं. १० रु.

१९) **माऊली माझी–कृपेची साऊली** : ले. गुं. फ. आजगांवकर किं. १० रु.

२०) **सोऽहम् ध्यान तरंग** : ले. सद्गुरु प्रभु किं. २ रु.

२१) **ओवी नामामृत सार** : (रामनाम महात्म्य) सद्गुरु प्रभु किं. २ रु.

२२) **'भाव माझ्या अंतरीचे'** (कविता संग्रह) : सद्गुरु प्रभु किं. ५ रु.

२३) **'आत्मसंवाद'** : सद्गुरु प्रभु किं. २ रु.

२४) **श्री देव वेतोबा स्तवन मुक्तावली** : सद्गुरु प्रभु किं. २ रु.

२५) **दत्तावतार वासुदेवानन्द सरस्वती** : (एकध्यायी ओवी चरित्र) किं. २ रु.

२६) **श्रीदेवी सातरी स्तोत्र** : किं. २ रु.

२७) **आनंदीयात्री** : ले. म. भा. माईणकर किं. ३० रु.

२८) **नारायण स्तवराज** : किं. ५ रु. गुं. फ. आजगांवकर

२९) **तबलापटु जी. एल. सामंत** : (चरित्र) गुं. फ. आजगांवकर

पत्ता : गुं. फ. आजगांवकर, १७ के. जी. बी. निवास
मॅजेस्टीक समोर, गिरगांव, मुं. ४. ❋ फोन : २९४२९२

गुरुवर्य ग. मा. दिवेकर

अठ्ठेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ व्यावसायिक गतकाळाचा विचार केला की मन प्रसन्न होते व कष्टीहि होते. स्थलकालाच्या अभावी व्यवसायात आलेले अनेक चांगले वाईट अनुभव मी सांगत बसत नाहीं. तसेंच मी हाताळलेल्या लहान मोठ्या दाव्यांच्या कथाही लिहीत नाही. या कालावधीत अनुभवाने व अभ्यासाने कायद्याच्या मूलभूत-तत्त्वांचे सम्यग् ज्ञान मिळाले. तसेच या व्यवसायांतील जी पथ्ये असतात ती तंतोतंत पाळण्याचा मी प्रयत्न केला आहे याचे मला समाधान वाटते. व्यवसायाच्या व माझ्या प्रतिष्ठेला न शोभणारी अशी एकही कृति माझ्या हातून झाल्याचे मला आठवत नाही. पक्षकाराला फसविणे, वाजवीपेक्षां जास्त पैसे वसूल करणे, विरुद्ध पक्षासी अगर त्याच्या वकिलाशी हात मिळविणी करणे, न्यायाधिशाशी खास ओळख अगर घसण आहे अशी बतावणी करणे, असल्या अनैतिक गोष्टी माझ्या हातून न घडल्याचे मला समाधान आहे. त्याचबरोबर या व्यवसायाची जनतेत रूढ झालेली नालस्ती व या व्यवसायात निर्माण झालेले अशिष्ट व अनिष्ट व्यवहार पाहून मन कष्टी होते. वकिलाच्या (आतां सॉलिसीटर व वकील यांत भेद कांहीं नाहीं.) व्यवसायाचे रुपांतर झपाट्याने धंद्यात होऊ पाहात आहे. 'इस्टेट ब्रोकर,' 'शेअर ब्रोकर' वगैरे दलालाप्रमाणेच वकीलही न्ययालयातले दलाल होऊ पाहात आहेत. ही गोष्ट दुःखाची आहे. कांही व्यावसायिकांकडून होणारे गैरप्रकार पाहिले अगर ऐकिले की या व्यवसायाचीच लाज वाटू लागते.